# योगभ्रष्ट

वसंत आबाजी डहाके

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २३००

REFBK-0021591
REFBK-0021591

२९५८१
संदर्भ
21/3/00
काव्य
2300



2300
29581
REFBK-0021591

# योगभ्रष्ट

## वसंत आबाजी डहाके

मौज प्रकाशन : २०७

पहिली आवृत्ती : मार्च १९७२
© वसंत आबाजी डहाके, १९७२

मुखपृष्ठ व रेखाचित्रे :
वसंत आबाजी डहाके

किंमत : दहा रुपये

प्रकाशक :
वि० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४



# अनुक्रम


*तर हे कवितेच्या देवा* १

दूरस्थ शहरांत २
फ्रान्झ काफ्का, डिसेंबर १९६७ ५
अहम् ७
पुस्तकांतील किडा ८
दिवसांचं बारीक धान्य ९
ससेहोलपट १०
शिशिर ११
पांढऱ्या स्वच्छ हुज्जतखोर आकाशाखाली १३
खुळ्या दैवतासारखा १५
बागुलबुवा १७
ओस झाल्या दिशा १८
स्वगत ३०
माझ्या खरखरत्या छातीवर ३२
किनारे ३३
एक निराधार नृत्य ३४




रस्ते ३५
सूत्र ३६
एक एक नक्षत्रांची रात्र ३७
सूर्यफूल ३८
दोन नुस्ते चेहरे ३९
अव्यक्ताचा नुस्ता आभास ४०
भयाणरिक्त आकाशाखाली ४१
एक अमानवी युगुल ४२
तूं अशी आंतून बाहेरून ४३
सर्वांतून सुटा होऊन ४४
तुझे एकदाचे डोळे ४५
हाक ४६
तुझ्या दृष्टीपलीकडे ४७
पाकळ्या ४८
हात ४९
अगाध आंतून रसवाहिन्यांतून ५०
भणभण एकाकीपण ५२
तुझंमाझं एक सूर्यफूल ५३
रक्ताच्या पलीकडची ५४
चेहरा ५५
चंद्र ५६




तरस ५७

दुपार ५८

दयेचा अंतिम वर्षाव ५९

अस्त ६०

तूं एकटी नाहीस ६१

स्पर्श ६२

आज पुन्हा सूर्य ६३

रूपक ६४

डोळे ६५

दूध ६६

झाड ६७

पावलं ६८

कळत नाही ६९

वारं ७०

मनुष्यहीन किनाऱ्यावर ७१

कुमार गंधर्व ऐकतांना ७२

सर्वत्र ईश्वर मिनलेला आहे ७४

एक विदूषक आत्महत्या करतो ७६

मृगजळ ७८

विशेषणें ७९

फणा ८०

सर्वत्र पसरलेलीं मुळं ८१

कीटक ९२

दाभाडे ९३

बिऱ्हाड ९४

लोकशाही वगैरे ९६

रोमन हॉलिडे ९७



संग्रहालय ठाणे
दा. क.
शाखा




सळसळ ९९

अभाग्याचें भाग्य १००

आमचे सलग जन्म १०१

सुरेशचा बाप १०२

झिजलेले योद्धे १०४

वेइमान भूमीच्या शोधांत १०६

उत्तरार्ध : विसाव्या शतकाचा, माझा १०८

बरणींतला महामानव १०९

जन्म १११

माझ्या लोकांचा आकांत ११२

मातीचं शास्त्र ११३

बाजारपेठ ११४

खडकाळ झाडावर ११५

वाद्यवृंद ११६

योगभ्रष्ट ११७

*रक्तवाहिन्या आटताहेत १४१*




प्रभासाठी



*तर हे कवितेच्या देवा,*
*तूं आपलीं प्रचंड दगडी पावलं*
*या शब्दाशब्दावर ठेवीत जा.*

*तर हे भुकेच्या, उन्हाच्या,*
*उद्ध्वस्त रात्रींच्या देवा,*
*आपल्या अजस्र दगडी पावलांखाली*
*मला सुखानं झोपू द्या.*

## दूरस्थ शहरांत

तोतया हुतात्म्यासारखा
चालतोंय मी खालीं मान घालून
या दूरस्थ शहरांत...
मी चालतोंय अधोलोकांतून
भयसूचक घंटेचा घणघण आवाज ऐकीत.
मी, शनीची दृष्टि असलेला
करवतीने कापतोंय माझा भूतकाळ.
सगळे पुढले दिवस अस्वस्थ,
प्राचीन हस्तलिखितांतील
लिपीसारखे अनुच्चारित.

मी चालतोंय या अंतर्वक्राकार रस्त्यावरून,
मागावर सोडलेल्या कुत्र्यांसारख्या डोळ्यांनी
शोधतोंय माझ्या हस्तरेषा कोरणारें दिव्य हत्यार.

या भव्य कीटकगृहासारख्या शहरांत
मी कोंडला गेलोंय जिवंत.
खुरटे पापभीरू जेथे
छाननी करताहेत शास्त्रोक्त वचनांची;
लोंबताहेत त्यांच्या मानेच्या गंडमाळा
खोडलेल्या अक्षरांवर
—ज्यांवर सांडलेंय माझें उकळतें रक्त
मध्यान्हींच्या सूर्याने काळवंडलेल्या तोंडांतून.

हे पापसंक्रामक
घसा सुजलेल्या सारिकेसारखे बद्ली नट
खिंकाळताहेत कटिप्रदेश हलवीत,
ओरडताहेत खोट्या दुःखाने
चौफेर फेर धरून टोप्या उडवीत.

बेसुमार स्फोट होताहेत अस्तित्वाचे,
वाहताहेत बाहेर बहिष्कृत शरीरयातना.

मी ऐकतोंय माझे कान फुटेपर्यंत
भोंगळ न्यायतत्त्वांच्या जर्जर ध्वनिमुद्रिका,
वोंगावताहेत अविरत
कॅपिटॅलिस्ट ज्यूकबॉक्समधून.
उलगडताहेत दर क्षणाला वकिली लपंडाव,
भटाभिक्षुकांचे स्वार्थी डावपेच
सोडतीच्या प्रत्येक गिरकींतून.

ओहो ! O Hell...

डोमकावळ्यांसारखे
वर्तमानपत्री विदूषक
टाचून ठेवताहेत भयावह बातम्यांचीं कात्रणें;
भुताच्या हातांतील दिव्याच्या उजेडांत
जाड टशांतील प्रेतवाहक गाडीवरोबर
दाखवलाय नरकांतील कुत्रा
कैवल्याची इमानी राखण करीत.

मी, देठ तुटलेल्या या शहरीं
काळोखाचा राजपुत्र, Prince of the Hell,
जमीन उकरून बाहेर काढतोंय
माझे आनंद, माझे उल्लास.

## फ्रान्झ काफ्का, डिसेंबर १९६७

एक रस्ता आहे काळा माझ्याआंत गुदमरलेला,
ज्यावर उगवलेलं मुरलीच्या स्वरांसारखं
तुरळक भ्रूण गवत;
आणि जेथे गळतं माझ्या घामांतील नैराश्य
माझीं पावलं भ्रमतात अखंड.
हीं माझीं निद्राभ्रमणं ओल्या काळोखांत.
प्रारब्ध जखडलं आहे पायांना नालेसारखं,
अस्थिर भ्रमतात पावलं.
मी एक आत्मिक लुटारू भोगतोंय हद्दपारी
ह्या निर्नाम रस्त्यावर;
भोगतोंय बंदिस्त कोषींतील माझे हजारों जन्म :
बेडकांचीं अंडीं, माशांचीं अंडीं, झुरळांचीं अंडीं.
मीं उतरवलेत स्वतःच माझे खुशमस्करे अंगरखे
जडवलेलीं ज्यांना आत्मकेंद्रित भिंगं, देवतेंचे कौल.
गळलेत महापापांचे ढलपे, चमचमते खवले पुण्याचे,
आणि उघडीं पडलींत आत्म्याचीं काळींभोर भोकं.
ओळींत उभे कापरं भरलेले भूतभविष्यवर्तमान तिन्ही त्रिकाळ;
मीं चेतवलेत डोळ्यांतील दुष्काळ वारा घालून
माझ्या सर्व ज्ञातअज्ञात पहारेकऱ्यांच्या;
उद्धवलेत हिडीस चेहरे वाकुल्या टाचलेले
ह्या विलक्षण रस्त्यावरील सर्व अदृश्य वस्तूंचे;
भांबावलेत, दचकलेत माझ्या श्वासांतील खच्ची केलेले बैल;
अंधुक झालेत स्वप्नस्थ नरकांतील प्रार्थनामंदिरांचे
कळस पिवळे म्लान;

गुंगीच्या जाड पडद्याआड दैवी वीर्यस्खलनाच्या
छिन्नविच्छिन्न रात्रीचीं प्रेमगीतं; जळकीं अभौतिक लाकडं
अक्षयनश्वरतेचीं.

एक अफाट बेढब बुटका हात शोकगीत लिहितो
शापित कवटीवर या रस्त्याच्या,
जशी जाड पाल सरपटते हिरव्या भिंतीवर
जिभेने ओढीत एक-एक नश्वर वर्ण.

## अहम्

काळाने पकडून घट्ट माझी मान पोलादी पंजांत
निर्दयतेने थडाथड आपटलें क्रूरकडक खडकावर सत्याच्या,
झिंजाडून झाडून सगळ्या अहम्च्या गुळण्या ओकलों मी अहम् अहम्.
मी : अहम् : विश्वाच्या अवाढव्य यंत्रणेंतील एक चक्र;
मी : चक्र : चक्रमय गतीने बेशुद्ध गरगरत जाणारा.
कित्येकदा मी अतिमानुष शक्तीच्या अदृश्य वाहक तारांना
माझ्या लांब वाढलेल्या नखांनी स्पर्शिलें
आणि मी कोसळत गेलों अहम् अहम्,
आणि ओसाड सूर्याच्या तारवटलेल्या तक्षकी डोळ्यांत
उमटत राहिलीं माझ्या कंगाल आणि अन्नान्न अवस्थांचीं स्थिरचित्रें.
कित्येकदा मी पांढरे चट्टे उमटलेल्या रात्रीचें
भेसूर तोंड पाहून चेकाळलों
आणि माझ्या छातींतले रस्ते सुने पडले,
चिरडत जाणाऱ्या टापांच्या आवाजांनीं.
आणि सौम्य निळ्या प्रकाशावर डोळ्यांतल्या
लाल तवंग पसरला रक्ताचा.
आणि झणाणलों झांजावलों अहम् अहम्.

# पुस्तकांतील किडा

मी चक्क पुस्तकांतील किडा, अत्यंत बिनबुडाचा
किंवा बी नसलेलें रसयुक्त फळ,
स्वतःच्या चरित्रावर एकसत्ताक राज्य करणारा
अथवा एक प्रचंड रुग्णालय.
सवताप्रमाणे सुधारणा प्यायलों
सुरक्षित नळीने
आणि रेखांकित केले कल्पित कथांमधले सर्व प्रकारचे द्रोह,
मैदानांतील उपदेशक
आणि सारंगीवर वाजणारी आज्ञा.

होय!
मी राहतों डोंबकावळ्यांच्या वसाहतींत
जशी तापलेल्या दुधावरची साय किंवा जखमेवरील खपली,
बहुधा पुतळ्याप्रमाणे निश्चल.
पाहतों आरशांत स्वतःचें ठेंगू प्रतिबिंब
आणि आरशाच्या बाहेर होतों रूपांतरित
शिवाजी शहाजी भोसले किंवा कार्ल मार्क्स.
मी येत नाहीं खिडकींत अथवा रस्त्यांत,
झाकतों माझा चेहरा गलेलठ्ठ ग्रंथांत,
ऐकतों डोंबकावळ्यांच्या वसाहतींतील कर्कश कावकाव,
बधिर सुन्नता.

बाहेर असतो तळपत डोंबकावळ्यांचा सूर्य
आणि डोंबकावळ्यांचे रस्ते शोकपर्यवसायी.

# दिवसांचं बारीक धान्य

या संध्याकाळच्या खिडकींतून
मी नुस्ता पाहातों शांत डोळ्यांनी
दूर रस्त्यावरील सजीव कत्तल :
सांगवला जाणारा एकेक दिवस.
हें माझ्या दिवसांचं बारीक धान्य,
उडालेलं सुकुमार तूस.

## ससेहोलपट

स्वप्नांवर काळ्या पडतात
तेव्हा मी उठतों झोपेंतून
चेहऱ्यावरचे ओंगळ शब्द पुसत.

तर अशी ही चिरफाळलेली सकाळ
आणि त्याआधीची कटाची रात्र
आणि त्याहीआधीचा फितूर दिवस.

पाहतात मख्ख डोळ्यांनी
माझी सर्वांगीण ससेहोलपट.

## शिशिर

अनाथ पाखराप्रमाणे
रात्रीच्या या फांदीवर बसलों आहें
मी मलूल म्लान.
मिटलेलीं आहेत सारीं फुलंपानं;
ज्यांत कोंडलेले आहेत माझे निःश्वास, माझीं उड्डाणं.

हे माथेफिरू रस्ते
उखडलेल्या पंखांसारखे
पडलेले आहेत सुन्न.

एका अगम्य भूखंडाचा शोध
जसा झालाय आता निरर्थक,
जशी ही गतिशून्य रात्र,
जसे हे माझ्या गळ्यांत मुडपलेले उच्चार.

हें मर्त्य नकशीकाम,
हा अपूर्वकल्पित अनियंत्रित इच्छांचा पिसारा,
हीं परमेश्वरानं रचलेलीं असंख्य बुबुळं :
पदार्थांचीं जीवांचीं अज्ञात ब्रह्माचीं.
या चरित्रहीन आयुष्यावर
भविष्याचं चाललेलं हें जरतारी भरतकाम :
कर्मवाद जडवाद स्याद्वाद अध्यात्मवाद.
हे दुखवस्त्यांचे मुखवटे.

एका हाडामांसाचा संबंध.

हे माझे डोंगराळ शब्द.
रात्रीच्या एकुलत्या फांदीवरचं हें स्वरविज्ञान.

मला ऐकूं येतोय मृत्युसूचक घंटानाद
पानापानांतून शहारत येणारा,
या कभिन्न रात्रींतील पानांचा धुवांधार वर्षाव.

## पांढऱ्या स्वच्छ हुज्जतखोर आकाशाखाली

पांढऱ्या स्वच्छ हुज्जतखोर आकाशाखाली
मी ईश्वरनिंदा करतों.
वाऱ्याच्या झपाट्यासारखा माझा आवाज
रक्तस्राव करीत जातो.
मी आव्हान देणारा हंगामी योद्धा
पाहतों पिचलेल्या डोळ्यांतून
ख्यालीखुशालीचे फिके बडेजाव;
करमणुकीचं संगीत नाटक;
जुनीं दोरखंडं उसवून काढलेला काथ्या
प्रगल्भ शब्दांचा.

माझ्या मृत पूर्वजांचे त्रस्त आत्मे,
माझे आयाळ झडलेले पितर
शाप देतात मला जळत्या उन्हाचा.
स्तब्ध शांत अगाध सूर्य
फुंकतो माझ्यांत आग्नेय वारा,
आणि माझ्या प्राणांच्या भव्य शिंपल्यांत
वेडाच्या झटक्याप्रमाणे धगधगीत लोळ.

मी या युगाच्या कातडीवरील
एक लहान जळता डाग :
एखाद्या माळरानासारखा ओसाड अर्थहीन.
माझं हें धनुर्वाती अस्तित्व,
निनावी आत्महत्येसारखं दुर्लक्षित,

मी उपसतों म्यानांतून आणि रोखतों
या स्वादरहित जगावर.

पांढऱ्या स्वच्छ हुज्जतखोर आकाशाखाली
एक हंगामी योद्धा.

## खुळ्या दैवतासारखा

जगाचा कर्ता
भयंकर प्रेतकळा आलेला :
जसं रंगीत छापील सुती कापड विरलेलं,
जसं आखूड कानांचं मोळं डुक्कर.
चकाकतोय पृथ्वीचा गोल
पुढल्या दातांवर वराहाच्या,
ज्याच्या गळ्याभोवती आवळली गेलीय
कालसर्पाची कराल मिठी.

मी झिंगलोंय उन्मत्त फूत्कारगंधानं,
मदमत्त होऊन छेडतोंय भररस्त्यावर
सर्वनाशाचं अपूर्व गिटार.
मी, देवाचं लाडकं जनावर, स्केपगोट.
मोकळे करतोंय माझे अनावर क्लेश;
छाटतोंय माझ्या सांध्यांत रुजलेलीं भविष्यकाळाचीं काटेरी झुडुपं.

टेहळणीचे प्रचंड दिवे
डागतात उजेड वांझपणाचा.
हेकड लाकडी नशिबाचे दिवस
वाळत घातले आहेत भुत्या वाऱ्यावर.
कालसर्पाच्या कराल सावलींत
चेचलेलीं गुन्हेगार मनं
दुराग्रहासारखीं ठसठसताहेत माझ्या मेंदूंत.
हीं ओल्या कोळशांसारखीं स्वच्छ माणसं

बोचकतात रक्तहीन पंजांनी
स्वतःचेच वितळून वाहणारे चेहरे,
जुनाट प्रसिद्धिपत्रकांसारखीं बाद झालेलीं ओशट शरीरं.
सर्द वाऱ्यासारखं वाहतंय दुःख
अस्थींच्या गंजलेल्या कमानींच्या रांगेतून,
ज्यांवर धरलींत जाळीं लाचारीचीं.

मी अंधश्रद्धेप्रमाणे उधळतोंय
हें माझं निर्हेतुक आयुष्य,
धुकं भरलेलं.
मला हवंय फक्त जंतुनाशक औषध फेसाळ
माझ्या मनाची असह्य फडफड थांबवणारं.
खुळ्या दैवतासारखा माझा एक पंजा उभारलेला :

मी थांब म्हणतोंय एका विराट नासाडीला.

## बागुलबुवा

आणखी एखादा बागुलबुवा
कॅलेंडरवर फडफडतो अवाढव्य तोऱ्यांत.
आशाळभूत समकालीन खांदे
झुकतात आणि त्यांच्या ओठांवर खेळतात
पर्यायी शब्दांच्या मालिका
आणि त्यांच्या आयुष्याचं चलनी नाणं
छन्न वाजून लुप्त होतं.

हे परमसुखाचे बेरकी हंगाम
लांब लांब पाय फेकीत जातात
माझ्या अकर्मण्य शरीरावरून.

## ओस झाल्या दिशा

१

सुरूच आहे न दिसणाऱ्या न ऐकूं येणाऱ्या वस्तूशी सनातन संघर्ष,
इंद्रियातीत ऑक्टोपसशी प्राणांतिक झुंज.
येतात जळत उकळत रक्तांतून लाव्हाचे फवारे
आणि होतात स्फोट मेंदूंतल्या मेंदूंत;
करकरणारीं सगळीं हाडं तीक्ष्ण धारांनी
छाटीत जातात शब्दांवरचे अवजड पापुद्रे.
मी रंधा फिरवतों या छिनाल अक्षरांवरून
आणि टाहो फोडतों आदिमायेच्या नांवानं :
तूं ओत हा ज्वालाग्राही चिखल
तुझ्या अमर्याद योनींतून आकार दे मला
ओत माझ्या रेताच्या बिंदूबिंदूंत
दुष्काळ अतिवृष्टि भूकंप अपघात वादळं वणवे
महापूर
चेतव माझ्या रक्तवाहिन्यांत लसलसते
खून दंगे जाळपोळी कत्तली महायुद्धं
उधळ माझ्या प्रत्येक उच्छ्वासांत
आपत्ति दुर्घटनांचे जालीम फूत्कार
मा, पेटीव माझ्या प्रत्येक पेशींत
तुझ्या संचाराचं उध्वस्त काहूर
झोडप मला आदिमशक्तीच्या खुटपाळीनं
कर मला तुझ्या दैवी अनाचारांचं अफाट खळं.

मी रोखतों कडाडून माझे देशद्रोही डोळे
या छेलछबेल्या उद्यानांवर,
वातानुकूलित आत्मलुब्ध उपाहारगृहांवर,
या सर्व मख्ख म्लान सडकांवर,
आणि दुकानांच्या बिळांवर,
आणि पिढीजाद गुलाम कळपांवर.
समुद्रासारख्या संगीतांत
मी धुऊन काढतों माझं मस्तक;
मी खोकतों अस्वलासारखा;
मी कडकडा जांभया देतों;
मी आदिमानवाचीं चित्रं काढतों;
मी स्वप्नं पाहतों हस्तमैथुनाचीं;
बलात्काराचीं, जबरी-संभोगाचीं
आणि उन्मत्त होतों
मी माझ्याच वीर्याच्या उग्रगंधकैफांत.

२.

सबंध दिवसभर
च्युतियासारखं वाटत होतं.
माझ्याआंत जळतंय एक शहर.
अथवा मी झालोंय रेल्वेस्टेशन
आणि धावताहेत अज्ञात दिशांनी वेगवान ट्रेन्स.
अथवा मी झालोंय दैनिक वृत्तपत्र.
मी पाहतोंय सारी मानवजात मुद्रणयंत्राखाली
काव काव अक्षरांच्या काळ्या कावळ्यांची.
टचाटच टोचले जातात

नियतीच्या मातृकांचे टोकदार खिळे.
देशपांडे यांचें देहावसान.
बस पेटून चौदा ठार.
सायगाव येथे भिक्षूचें आत्मदहन.
भीषण अपघात. मुलगा जखमी बाप मेला.
तरुणीचा अपघाती मृत्यु.
भावाने बहिणीचा खून.
शिकार करतांना शिकाऱ्याची शिकार.
विहीर फोडतांना दगड उडून तीन मेले.
उत्तर विएतनामवर बॉंबहल्ला. १५० ठार.

सालं प्रसन्न राहिलं पाहिजे.
वाढलेलीं नखं कापलीं पाहिजेत.
झालंच तर तैमूरलंग बनलं पाहिजे.
आणि मी म्हणालों :
एखाद्या माणसाचा मृत्यू
त्याला ओळखणाऱ्या माणसांच्या जगांत
दुःखद आणि भयानक गोष्ट आहे.
न ओळखणाऱ्यांच्या जगांत
ती महत्त्वहीन गोष्ट आहे.
एक कीटक मरतो
एक हत्ती मरतो
एक भिंत कोसळते
एक झाड उखडतं
एक विमान पेटतं
एक माणूस मरतो
निसर्गात हजारों जीव प्रत्यहीं जन्मतात

प्रत्यहीं मरतात.
अजस्र अमर्याद गूढ निसर्गाच्या डोळ्यांत
एखाद्या माणसाचा मृत्यु
ही फार क्षुल्लक गोष्ट आहे.
तैमूरलंग परमहंस होता :
हजारोंचीं मरणं पाहण्याची शक्ति
त्याच्या बुबुळांत होती.

मी होतों तैमूर अथवा महम्मद तघलक
आणि मी होतों
अनपेक्षित आपत्तींतील ईश्वरी हात
आणि भिंत भिंत भिंत विश्वांतील
रंगवतों दहशतीच्या काळ्या अक्षरांनी :
जे ठार होणार होते
ते ठार केले गेले
ज्यांचे हाल करायचे होते
त्यांचे हाल केले गेले
जे पिटण्यांत यायचे होते
ते पिटले गेले
तर हे देवा,
आम्हांस आपत्तींपासून वाचव.
तुझ्या गुन्ह्यांत आम्ही राहत नाही.

३.

आमच्या अस्तित्वाचे थरथरते थेंब
शहराच्या फाटक्या पानावर

रेंगाळतात थांबतात ढळतात.
आम्ही अश्रद्ध आणि असंतुष्ट पिढींतील,
आम्ही खाली सही करणारे,
सामान्य सामाजिक व आर्थिक हक्कांपासून
वंचित झालेले
मागतोंय
आमच्या पापांचा मोबदला.
आम्ही ठेंचाळत वाट काढतों
पुष्कळ पायांच्या चिथावलेल्या जमावांतून.
हलक्या दर्जाची थट्टामस्करी,
विषारी माशांच्या गुणगुणीसारखी,
आणि पिवळे गढूळ डोळे
खुरपतात आमच्या पाठी.
आम्ही म्हणत जातों रस्त्यांतून
आक्रस्ताळ्या आवाजांत :
बज रही हैं घंटियाँ
बज रही हैं घंटियाँ
काल की घंटियाँ
मृत्यू की घंटियाँ
बज रही हैं घंटियाँ

सगळ्या आकाशांत जमिनींत झाडांत
रस्त्यावरून जाणाऱ्या माणसांच्या शरीरांत
घरांच्या भिंतींवर छपरांवर
आपटून तुकडे विखुरलेले आवाज :
बज रही हैं घंटियाँ...

आम्ही देवनिंदक.
आम्ही विरोध करतों
त्याच्या सार्वभौम सत्तेला.
आम्ही हाका मारतों किंचाळून
परमेश्वराच्या नांवाने.
आम्ही देतों शिव्या भडव्या गाढवा.
आम्ही म्हणतों एकमेकांस
शोधून काढ साल्यास,
ठेचून काढूं
या खडी दाबणाऱ्या अवजड धुडाखाली.
आम्ही गातों असंबद्ध
आणि आमचीं संत्रस्त शरीरं
विझवतों कवितेंत.
आणि धुमसतों अधिकाधिक
आणि जळत जातों
दोन्ही टांगांच्या मधून
मस्तकापर्यंत आरपार.
आम्ही करतों पितृवध आणि मातृवध
आणि दर क्षणाला आत्मवध.
आणि आमचीं लिबलिबीत हडकुळीं
मांस झडलेलीं बोटं उगारून
ओरबाडूं पाहतों सूर्याची कोमल त्वचा.
लोंबकळतील चैतन्यहीन किरणं
नागड्या जगावर
आणि उघडीं पडतील सर्वांचींच
नश्वर ढुंगणं.

४.

माणूस इथूनतिथून सारखाच.
एकदम तिरस्करणीय.
मी तिरस्करणीय
तूं तिरस्करणीय
तो ती तें
सर्व तिरस्करणीय.
तुम्ही ज्याच्यावर प्रेम करतां
तो तुमचा तिरस्कार करतो.
तुम्ही ज्याच्यावर प्रेम करतां
तो तुमच्यावर प्रेम करतो.
तुम्ही ज्याचा तिरस्कार करतां
तो तुमचा तिरस्कार करतो.
तुम्ही ज्याचा तिरस्कार करतां
तो तुमच्यावर प्रेम करतो.
म्हणून तुम्ही त्याचा तिरस्कार करा.
तो तुमचा तिरस्कार करील
अथवा तुमच्यावर प्रेम करील.
म्हणून तुम्ही प्रत्येक गोष्टीचा तिरस्कार करा.
म्हणून मी तुझा तिरस्कार करतों.
तूं माझा तिरस्कार कर
अथवा माझ्यावर प्रेम कर.
म्हणून तूं प्रत्येक गोष्टीवर प्रेम कर.
म्हणून तूं प्रत्येक गोष्टीचा तिरस्कार कर.
म्हणून तूं जीवनाचा तिरस्कार कर
आणि मृत्यूवर प्रेम कर.

म्हणून तूं मृत्यूचा तिरस्कार कर
आणि जीवनावर प्रेम कर.

दगड आणि माती
दगड आणि माती

५.

मी एखाद्या ब्रह्मराक्षसानं झपाटल्यासारखा
ब्रह्मराक्षसानं झपाटलेल्या दिव्यांच्या प्रकाशांत
ब्रह्मराक्षसानं झपाटलेल्या सडकांवरून.
अश्वत्थामा आहें मी :
डोक्याला जखम झालीय माझ्या,
तेल मागत हिंडत असतों दारोदार.
एका अदृश्य हातांतील घणाचे आघात
थडाथड मस्तकांत सारखे आघात;
या असह्य आघातांनी
तुटून पडताहेत झाडं
शरीरांतील स्नायूंचीं.

असंख्य तीक्ष्ण नख्यांचा एक अजस्र किडा
कुरतडतो आहे सतत,
कुरतडतो आहे झाडं
आणि नवनवे चंद्र
आणि झऱ्याचं पाणी.
लव झडून गेलेली
विद्रूप कातडी जगाची

तडकते आहे हळूहळू.
मी भोगतोंय माझ्यांत
या महान कुरतडीच्या वेदना.
अरे, मी गेंडा आहें महारोग झालेला
किंवा सरडा असेन
किंवा मी एखादं
उजाड आणि ढासळलेलं शहर.
पहा माझ्या बरगड्यांमधून
भुसभुशीत माती सांडते आहे.
मी निमूट सोसतों भयाण घावासारखं
प्राप्त झालेलं वास्तव
आणि मी हाकारतों उंच आवाजांत :
हे सैतानाच्या दूता
युद्ध दे
भूक दे
बेकारी दे
स्वीकारतों आम्ही हें सर्व
तूं दे कांहीही
जाणार आहेत आमच्याच छातीमधून
भविष्यांतील लक्षावधी युगांचे महामार्ग.

आणि मी म्हणतों माझ्या सावल्यांना :
सत्य आहे हें सारं
या विशिष्ट क्षणीं
मीही माणूसच
माणसाच्या सर्व
आशाआकांक्षाभावनाकल्पनाप्रयत्नदैवासह

रक्तमांसहाडश्लेष्मयुक्त
मी जन्मलों
माझ्या आधी कोणी
माझ्या नंतर कोणी
जे जे जन्मले
त्या सर्वांना हें सारं अटळ.

६.

आता तुम्ही विचाराल की जग म्हणजे काय?
तर जग म्हणजे कांही नाही.
आता तुम्ही म्हणाल की हें असें कसें?
तर हें असेंच.

मग लोक घरोघरीं निघून गेले
व मी नष्ट झालों.

उदाहरणार्थ, हा सूर्य उगवतो आणि मावळतो.
त्याच्या प्रकाशांत आम्ही पाहतों
प्रत्येक जणाच्या डोक्यांतला अंधार
आणि भासवतों की प्रत्येकाच्या डोक्यांत
एक-एक सूर्य वगैरे आहेच.

मग लोक घरोघरीं निघून गेले
व मी नष्ट झालों.
एके दिवशीं सर्व लोक जमले
व माझ्याकडे पाहूं लागले

तेव्हा मी म्हणालों :
भेकडांनो, तुमचे चेहरे किळसवाणे आहेत
व माझेही
आणि तुमच्यांतील प्रत्येक माणूस
दुसऱ्याला तुच्छ वगैरे समजतो
व मीही
तर तुमचं जीवन
नरकांत वळवळणाऱ्या अळ्यांचं आहे
व माझंही
तर मी एक मिनिट शोक करतों
व एकच मिनिट नखांनी बोचकारतों
माझा चेहरा.

मग लोक घरोघरीं निघून गेले
व मी उरलों.

एकदा कांही लोक आले
तेव्हा मी त्यांना म्हणालों :
तुमच्या दृष्टीच्या अत्यंत पलीकडे
देवदूतांची भूमि आहे
तिथून जे गाण्याचे मंद मंद होत येणारे
हळुवार स्वर
तुमच्या कवटीआंतील कवटीत
अस्वस्थपणें येरझारा घालीत राहतात
ते मला द्या.

मग लोक घरोघरीं निघून गेले

व मी बसून राहिलों.
व मी मलाच म्हणालों :
हीं जीवनाच्या मळवाटेवरून
मुसमुसत चाललेलीं माणसं
ज्यांच्या दबलेल्या हुंदक्यांनी
भरून गेलीं आहेत
माझ्या शुभ्र हाडांचीं जंगलं.

७.

मी आलों एका क्ष चौकांत
तेव्हा मला वाटलं,
सारी शक्ति ओसरून गेलीय आपल्यांतली
व आपण म्हणजे झालोंय क्ष चौक :
असा एक, ज्यांतील सर्व दुकानं बंद
व एकही मनुष्य फिरत नाहीय रस्त्यावरून;
दूर निघून गेलींयत कुठंतरी
सारींच माणसं गाव सोडून;
आणि त्यांच्या अस्तित्वाच्या खुणांवर
ओसाडपणाचा वारा वाहतोय झणझणा;
असा एक निर्मनुष्य ओसाड चौक आपण झालोंय.
फक्त एक अतिमानुष्र भूगर्भांतून जन्मलेली
प्रखर शीळ स्पर्शतेय या ओसाडपणाला;
घुमतेय सर्वांगांतून आपल्या म्हणजे चौकाच्या.

## स्वगत

केवळ बाहुलं; भीतिग्रस्त खिन्न हर्षभरित
क्षुधार्त सत्तावीस वर्षं. चांदण्याचे पक्षी. जळकं लोखंड.
धगधगीत स्वरांचं वाद्य. उदासीन प्रार्थनामंदिर.
झरत गेलं एकेक वर्ष काळाच्या मातींत.
विमनस्क भटका सरदार. थकलेला घोडा
नदींतून चालत पलीकडे जातो, भोवऱ्यांत गरगरतो.
पापणीच्या केसांनी उचलतो संध्याकाळ,
धुरकट पाण्यांतला चेहरा. फकीर. योद्धा. आदिशेष.

तीनशून्यतीनएकनऊचारदोन

काळ्या झाडांच्या रानांतून येतात सनईचे स्वर काळे.
काळीं जहाजं काळ्या समुद्रावर, काळे समुद्रपक्षी
खांद्याच्या हाडावर बसलेले. कातरलेले पंख
कातरतात आकाश. पातकी माकडासारखा
ऊर फुटून एकाग्र गातोंय, भरून टाकतोंय हाडांतील पोकळी
काळ्या गीतांनी.

या भव्य प्रार्थनामंदिरांतील माझे आवाज
तुझ्यापर्यंत येवोत.
तुझ्या जहरी तजेलदार सर्पांचे डोळे
माझ्या डोळ्यांना
भिडलेत.
माझ्या छातींतले आर्त कल्लोळ
तुझ्यापर्यंत येवोत.

माझे स्पर्श तुझ्यापर्यंत येवोत.
मी विवस्त्र उजाड, सत्तावीस काळे पडदे
सारून सत्तावीस विरलेले मुखवटे,
सत्तावीस शिशिरांतील पानझड,
सत्तावीस ग्रीष्मांचे सत्तावीस खुनशी सूर्य.
आयुष्य
काळ्यानिळ्या रंगाचं.

माझ्या मनाचा सरडा
काटेरी झाडांवरून काळ्या
सरपटतो अस्थिर
रोगग्रस्त वर्षांच्या
निष्पर्ण झाडींतून
विकल निशाचरासारखा.

मी श्वास आंत ओढतों :
फासळ्या वाजतील का
तंग तारांप्रमाणं.

## माझ्या रखरखत्या छातीवर

माझ्या रखरखत्या छातीवर मी झेलतों नव्या पाउसाच्या धारा,
डोळ्यांत जमलेल्या चिकट रक्तावर पसरतो निळा प्रकाश
आणि माझ्या अस्थिमांसचर्मांतील काळ्या पक्ष्यांचे पंख उजळतात हिरवे.

## किनारे

लाटेवर तरंगत आहे माझा लाकडी चेहरा,
त्वचेंतून बाहेर येतोय पांढरा फेस आणि शेवाळ :
या अमर्याद समुद्रावरील वेदनेचा तवंग
आणि तेलकट मरणाचा गाळ.
या पांढऱ्या फेसांतील बुडबुड्यांचे हजार डोळे
फुटतील आणि उखडलेले सांधे वाहत जातील...
माझे आक्रोश गळ्यांतच अडले तर
तुझ्यापर्यंत कसे येतील.
माझे हात मधेच थकले तर
किनारे जवळ कसे येतील.

# एक निराधार नृत्य

मी माझ्या स्वाधीन नाहीं;
तूं तुझ्या स्वाधीन नाहीस.
भोवळ येईपर्यंत नाचणं चाललंच आहे
एका छद्मी डोळ्यासमोर,
ज्याचे वेढे पडले आहेत आपल्याभोवती.
आपले आविर्भाव एका रित्या अवकाशांत
उमटतात, नाहीसे होतात;
आणि हा सगळा रिता पसारा विसरण्यासाठी
नाचतच राहतों आपण.
आपल्या फुटलेल्या पावलांचं रक्त
प्रतिबिंबतं एक निराधार नृत्य.

## रस्ते

आता मीं छातींत भरून घेतलाय थंड काळोख
आणि डोळे झाले आहेत निर्मनुष्य रस्ते.
हीं कौटुंबिक घरांचीं शहरं
सोडून निघालीं आहेत माझीं विरक्त पावलं.

ही वाट तुझ्याकडे येत नाही
आणि उदास असा मी हिंडतोंय
तें तुझ्यासाठी नाही.

आता पावलं फिरताहेत तीं
फक्त रस्ते आहेत म्हणून
आणि रस्ते कुठं जातात
तें मी विसरलों आहें.

## सूत्र

ज्या सूत्राच्या आधारानं चालत होतों
तें सूत्रच कोणीं तोडून टाकलंय.
मी सरळ तिथपर्यंत चालत गेलों
आणि नुस्ता परतलों.
हे रस्ते मला ओळखत नाहीत.
अरे, मला साद घालणाऱ्या रस्त्यांनो,
कसं तुम्हीं मला पोरकं करून टाकलंत.

# एक एक नक्षत्रांची रात्र

एक एक नक्षत्रांची रात्र उमलून नासून जाते;
एक एक प्रहर या ओसाड डोळ्यांत रणरणत विझून राख होतो;
गोठून वाकडे होतात आकाशभर पसरलेले बाहू, जेव्हा तुटतो
मनांतला तारा आणि दुराव्याचा अलिप्त वारा अंग शहारतो.

आता हे ओठ फुटून बाहेर येईल ती हाक
या नासलेल्या नक्षत्ररात्रीसारखी असेल.
तेव्हा तुझं मन पिळवटलेलं असेल ?
पाकळ्या मिटून सुन्न बसलेलं असेल ?

## सूर्यफूल

जेव्हा एखादं सूर्यफूल मरून जातं
जमिनीचीं आतडीं उसवतात,
रक्तहीन सूर्याचीं पांढरीं शुष्क हाडं
आभाळांत रुतायला लागतात.

पाकळ्या झडलेलं सूर्यफूल
असं आयुष्य
तुझ्या अंगणांत विखरून पडलं,
तेव्हा तुझे डोळे ओघळून वाहायला लागले.
अग, तू तुझ्या इवल्याशा हातांनी
वारा कसा थांबवशील;
कसं थांबवशील सूर्यफुलाचं मरण,
तुझ्यामाझ्या सूर्यफुलाचं पाकळ्या गळणं

## दोन नुस्ते चेहरे

दोन नुस्ते चेहरे :
अवाक्.
आयुष्याच्या परिघांत अडकलेले,
स्वत:तच खोल बुडालेले.
भाषा किती अर्थहीन शस्त्र असते
अंधार भेदण्यासाठी.
हा संबंधांचा निःशब्द समुद्र.
आणि तुझेमाझे पार्थिव चेहरे,
डोळेही फसवे
प्रतिबिंबतात केवळ
घटनांच्या प्रसंगांच्या रेषा.
म्हणून तर मी देह विसर म्हणतों.

## अव्यक्ताचा नुस्ता आभास

अव्यक्ताचा नुसता आभास, एखादा अर्धा उघडा डोळा
मी पाहतों आणि माझे डोळे उलटतात :
मी माझ्या एखाद्या जागृत डोळ्यासमोर
अगदी उघडा पडतों.

मी उरतों नुस्ता रक्तवाहिन्यांचा गुंता.

माझ्या काळ्या रक्ताचा आक्रोश
तूं ऐकला आहेस काय ?

## भयाणरिक्त आकाशाखाली

भयाणरिक्त आकाशाखाली
आपलं अधांतरी आयुष्य
काळाच्या लाटांवर वरखाली होणारं.
आपले चेहरे रापतात, उसवतात;
हिंस्र आपले चामड्याचे हात
सैलपणे वळवळतात.
आपण असतों केवळ जखमी जनावरं,
एकएकटे.
आणि आपल्या किरट्या पायांना
नसतो आधार कशाचाही.

त्या अतिविराट शून्य क्षणीं
तूं माझी रहा.

# एक अमानवी युगुल

एक अमानवी युगुल मी चितारतों
आणि ऐकतों रक्तांतील वादळाचा झणझणाट.
कधी कधी अशाच रक्तावर तरंगतात
हिडीस देहाकृती.
जेव्हा आतडं पिळवटत नसतं
कुणाचसाठी.
तेव्हा शिवलिंगांतून उगवतो सैतानी चेहरा
गळक्या डोळ्यांचा
ज्यानं छिन्नविच्छिन्न केलंय नुक्तं एक शरीर,
एक मादी, एक योनी.

मी असह्य एकाकी तुला हाक मारतों.
माझ्या मस्तकावर तूं नुस्ता हात ठेव.

## तूं अशी आंतून बाहेरून

तूं अशी आंतून बाहेरून आहेस,
मीही आहे तसाच नाही.
मला इच्छांचे लवलवते कोंब्र आहेत.
ते तुझेच आहेत.
तूं ऊन-वारा-पाणी आहेस.
तूं आता या कोंबांतून
स्वतःलाच हाक घालते आहेस काय ?
तुझी हाक मी आहें
आणि उत्तरही मीच आहें.

## सर्वांतून सुटा होऊन

जेव्हा मला तुझी अनावर आठवण अपुरी पडते
त्यावेळी मी फार एकटा पडतों;
मला जाणवणारी प्रत्येक वस्तु आकांत करते
आणि मी असतों सुन्न, स्तब्ध.
या एकटेपणाला मी नांव दिलंय वैरागी एकांत.
अशा वेळीं मी कांहीच करीत नाहीं :
तुझी आठवणदेखील.

मी सर्वांतून सुटा होऊन राहतों.

## तुझे एकदाचे डोळे

तुझे एकदाचे ओले डोळे
मला विसरतां येत नाहीत.
मी किती मर्यादित आहें :
तुझा भूतकाळ मला माझा करतां येत नाही
आणि मला भविष्याचे डोळे नाहीत.

म्हणून मी वर्तमानकाळच लांबवतों.
मी या विशिष्ट क्षणीं अनुभवतों साक्षात्
वर्तमानकाळाचा एक अनादि अनंत पट्टा.
तुझे डोळे माझे डोळे मिसळलेले.

माझे डोळे ओले झाले आहेत.

## हाक

तूं समोर किंवा मागं नसतेस
तेव्हा मला वाटतं
तूं नाहीस.
मग मी वेड्यासारखा हाक देत सुटतों
आणि मी हाकच होऊन जातों.
केव्हातरी मी थांबतों.
पण हाक देणं सुरूच असतं...
ती हाक कोण देतं ?

## तुझ्या दृष्टीपलीकडे

गैदी माणसांसारखे लाळ गाळत चाललेले दिवस.
मी पाहात पडलोंय जुनाट घडी घातलेल्या कागदाप्रमाणं
दंतकथेमधलं एखादं शहर, धुक्यानं भरलेलं,
आणि प्रत्येक वस्तूला दचकणारीं हीं माणसं
आणि हें माशीसारखं क्षणभंगुर जगणं.

तुझ्या दृष्टीपलीकडे आहे माझी असह्य फडफड,
माझ्या पंखांतील एकेक पीस अमानुषपणं गळून जाणं.

## पाकळ्या

एक एक शहर मागं पडत गेलं काळ्या सावल्यांचं
तरी उंच इमारतींचीं छिनाल पिवळीं बुबुळं
तुझ्यावर जडलेलीं मीं पाहिलीं आहेत.
तेव्हा अनोळखी रस्त्यावरून जातांना मीं ऐकलं आहे अभद्र कानांनी
तुझ्यांतून उचंबळलेलं छटेल लकेरीतलं गाणं.
आणि मीं अनुभवल्या माझ्या छातींतल्या गुलाबांच्या पाकळ्या
एकएक गळून पडतांना.

## हात

ही अशी अचानक अर्थहीनता.
आंतून उमळून येते
आणि माझ्या डोळ्यांपुढचं वास्तव
महापुरांत बुडत चाललेलं शहर बनतं
तेव्हा मी निपचित पडून राहतों,
अनुभवतों अतितीव्र असहायता
आणि माझे विकल तळहात
असहाय फडफडतात.

असल्याच्र क्षणीं
हवे असतात तुझे हात.

## अगाध आंतून रसवाहिन्यांतून

अगाध आंतून रसवाहिन्यांतून
फुटत बाहेर येतात हीं फुलं.
माझे डोळे उगवलेत अनंत रस्त्यावर;
तुझी निळी छाया माझ्या आत्मिक शुभ्र फुलांवर

तूं ही फुलं,
हे विलक्षण शांत रंग,
माझा चेहरा, माझे मायामय डोळे.
मी झालोंय अशेष ओंकाराचा घोष
तुझ्या शरीरांतील प्रवाही द्रवांत
मंद मंद घुमणारा.

हे सोडलेत माझे तुझे आंतील स्वर
ह्या संथ वाहत्या रस्त्यावर
माझ्यातुझ्यापर्यंत.

ह्या फुलांच्या बीजांतील प्रत्येक दिवसावर
माझ्या तुझ्या शरीराचे वाहते क्षण,
व्रण, आघात अगाध.

अगाध आंतून रसवाहिन्यांतून,
रसवाहिन्यांतील तेजोमय काळोखांतून
बाहेर येतों आपण,
तसे आलों एकमेकांच्या कुशींतून

आणि आहेत हीं फुलं
अगाध आंत रसवाहिन्यांत, शुभ्र निर्वात निःशब्द.

निराकार फुटत बाहेर येतात हीं फुलं
आणि माझीं बुबुळं तुझीं बुबुळं
तरंगताहेत
नुस्ती बुबुळं
अनादि काळाच्या ह्या संथ पाण्यावर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३-०-३१-०४
दा. क्र. २१५११
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## भणभण एकाकीपण

भणभण एकाकीपण कोसळणारं उघड्या माळावर.
माझे दोन डोळे दूर जडलेले.
मी होऊन जातों या विशिष्ट क्षणीं
उघडा माळ, खुरटीं झुडुपं, रखरखीत एकांत
आणि माझ्यांत भिनत जाते विश्वरहस्यासारखी
एक विलक्षण संध्याकाळ.

जेव्हा माझे सव्वीस ग्रीष्म
तुझ्या ओठांवर विसावले
तेव्हापासून तुला माळ आहे.
मला कोण आहे ?
मला आहे फक्त एक संध्याकाळ
स्पर्शातीत.

## तुझंमाझं एक सूर्यफूल

तुझंमाझं एक सूर्यफूल.
एखाद्या सूर्यफुलाप्रमाणं आपलं आयुष्य
सूर्यस्तोत्र होऊन जावं.

तुझा हात आहे माझ्या हातांत,
आता ही वाट जड जाणार नाही.
हा अनादिअनंत रस्ता
आणि आपण दोघंच
हात गुंफलेले.

## रक्ताच्या पलीकडची

कधी तू मला किती अनोळखी वाटतेस
रक्ताच्या पलीकडची. तटस्थ. परकी.
तेव्हा मीच परका होऊन जातों.
माझ्यासमोरचं जग अधिकच खुरटं
किरट्या रेषांतील चित्रासारखं.
माझ्या आयुष्यांतील व्यापक उदासीनता
मी झाकूं लागतों
एखाद्या नखरेल ओळीआड.
त्या ओळींत मी तुला येऊं देत नाहीं;
मी नकळत येऊन जातों.

## चेहरा

कुठून कसा वाहत आला एक चेहरा : तो म्हणालों माझा.
हे हात माझे माझ्या हातांत गुंफलेले, डोळे डोळ्यांत बुडालेले.
हेही माझंच एक शरीर माझ्याशीच बांधलेलं.
माझं सुखदुःख, माझे आकांतउद्वेग.
साक्ष देवालयांतील घंटांचा नाद, अगम्य सूत्राला बांधलेल्या.
दगडी डोळ्यांची साक्ष तटस्थ निर्विकार.
निर्विकार माती, निर्विकार आकाशाचा चेहरा.

# चंद्र

जंगली बैलासारखा चंद्र
मुसंडी मारून पुढं येतो
हिरव्या अलौकिक झाडीआडून.
तीक्ष्ण दातांनी कापलेलं पाणी
थरारत राहतं रात्रभर.

रात्रभर
रुंद पात्याची तलवार
फिरते कमरेपासून डोक्यापर्यंत.

## तरस

तरस
मांड्या जांघा छाती गळा
तरस
डोळ्यांतून
तरस
बाहू
पंजे
तरस
हाकेंतून
तरस
या रुख्यासुक्या रानांत
एकाकी

## दुपार

ही आहे संपूर्णपणे एक दुपार :
एक हजार तुकडे एकाकीपणाचे.
मी मोजतों
मी जुळवतों
मी घडवतों
मी जोडतों.
हे आहेत माझे नागडे हात
एका नागड्या दुःखी टेबलावर.
मी धरूं पाहतों हा क्षण,
हा संपूर्णपणं शुष्क तुकडा काळाचा.
माझे डोळे आहेत उघडे वासलेले.
मी अनुभवतों एक कठोर वेडसर स्पर्श
एकाकीपणाचा.
एक पागल एकाकी पांढरा सूर्य
टांगलेला आहे
पांढऱ्या आकाशांत.

## दयेचा अंतिम वर्षाव

जन्मापासूनचा ओंगळ इतिहास,
हे स्वैर लैंगिक व्यवहार लादलेल्या करांसारखे,
हीं बौद्धिक बांडगुळं, देवतांचे उपहार,
—या सर्वांवरून पावलं ओढीत जातो
एक बिनडोक्याचा माणूस,
ज्याच्या सुतकी हाडांवर होतोय
दयेचा अंतिम वर्षाव.

# अस्त

जमिनींत मुळं रुतवून असलेलीं स्थावरजंगम माणसं
ज्यांना धास्ती असते सतत झंझावाताची
आणि जीं दचकून शिशिराला उमलतात भीतीनं
तीं तुला समजून घेऊं शकत नाहीत.
मीं झंझावात सोसला आहे
आणि शिशिर वागवतों अंगोपांगीं.
आणि जेव्हा मी तुला स्वीकारतों
तेव्हाच मीं माझा अस्त स्वीकारलेला असतो.

## तूं एकटी नाहीस

चंद्र
मला इथं पाहतो,
तुला तिथं पाहात असेल...
तूं एकटी नाहीस
असं मला म्हणायचं आहे

## स्पर्श

तुझे हात साधेच असतात.
एरवी
तसे ते नसतात साधेच
जेव्हा माझ्या शिणलेल्या कपाळावरून फिरतात.
मी माझं त्रस्त मस्तक
तुझ्या ओंजळींत देतों, मांड्यांत खुपसतों,
तेव्हा तूं दुःख वेचतेस हळुवार स्पर्शानं,
जशीं तुझ्या आवडीचीं फुलं तूं वेचावींस.
तसे तुझे नुस्ते साधेच हात
मी हातांत घेऊन पाहात राहातों.
तूं नाहीस, नसतेस,
तरी असतो तुझा स्पर्श
माझ्या प्रत्येक आकांतयातनेंत.

## आज पुन्हा सूर्य

आज पुन्हा सूर्य फुलासारखा कोमल वाटतो आहे.
नुकतींच उमललेलीं शुभ्र-तांबडीं कमळफुलं
तुझी आठवण करून देतात.

सूर्य आहेस तूं
प्रकाश आहेस तूं
फुलं आहेस तूं
गंध आहेस तूं

पुन्हा पहिल्यासारखं सारं वाटतं आहे.
आज पुन्हा हुरहुरीची लाट फुटली आहे;
आज पुन्हा सूर्य तुझ्यासारखा कोमल वाटतो आहे.

## रूपक

मला कोरड्या अवकाशांत नुस्तं एक झाड दिसतं :
वाळलेलं, फांद्या तोडलेलं;
खाली जमिनीवर पुष्कळशीं माणसं सरमिसळलेलीं :
त्यांतल्या कुणाच्या तरी हातांत एक मोठं फूल,
सहस्र पाकळ्यांचं.
तीं माणसं बोलत नाही आहेत;
तें सहस्र पाकळ्यांचं फूल बोलतंय.

अर्थातच हें एक रूपक आहे.
जेव्हा मला तुझा आणि तुला माझा
शोध लागलेला नव्हता, तेव्हाचं.
आता तुझ्या माझ्या श्वासांत गंधांत
त्या फुलाचं भाषण ऐकूं येतं.
तरी मीं हें रूपक जपलं आहे,
कारण शोध अनंत आहे
आणि फुलांची भाषा अनादि.

## डोळे

अफूसारखी रात्र
जेव्हा चांदणं हंबरतं पाण्यांतून,
तसे तुझे डोळे

माझ्या चेहऱ्यावर ओथंबलेले.

## दूध

काळजाच्या फुलांतून
स्वर आले उधळीत
वासनागंध मदिर.

आलं भरून कैफांनी
डोळ्यांतलं आभाळ.

तटाटले स्तन तुझे,
बंध तुटले चोळीचे;
ओठांवर माझ्या
दूध वाहे ओसंडून.

## झाड

तूं आहेस एक अपार्थिव झाड
माझ्याआंत सतत वाढत जाणारं.
माझ्या रक्तवाहिन्यांतून तुझ्या फांद्या.
मी ऐकतों आंतआंत
तुझ्या पानांची सळसळ.

# पावलं

पिकलेल्या केसांचा घोगरा सूर्य
माझ्याकडे पाहतो
आणि कुरकुरतो बीजागरं कुरकुरावीं तसा.
नाहीच ओळख माझी
या केसांच्या टोप्या घातलेल्या झाडांना
आणि त्यांच्या ठरीव बाराखडींत कूकणाऱ्या पाखरांना.
जेव्हा चेहरे फिरवतात
या पोक्त वयस्क बायकांसारख्या जड इमारती
तेव्हा रस्त्यासाठी असतात माझीं शिणलेलीं पावलं
तुझ्याकडे येणारीं.

## कळत नाही

असं अचानक
मन खिन्न कां होतं,
असं एकदम
एकाकी कां वाटतं.

मला अजून हें कळत नाही :
तुझे हात माझे हात
झाले तरी.

## वारं

सांडलं ग सारं कुंकू,
देहभर झालं सारं;
कसं सकाळीं सकाळीं
सैरभैर आलं वारं.

## मनुष्यहीन किनाऱ्यावर

मागें अगदी पाठीशी लागून मर्त्यांचं महानगर,
समोर अगदी कानाशी मनाशी वाजतोय समुद्र.
एक समुद्रच ओळखीचा माणूस आहे ह्या मला परक्या शहरांत
जो तुझ्यांतून माझ्यांत वाजतोय, जसं आपण ऐकलेलं जॅझ
अत्यंत एकट सायंकाळीं.
ही समुद्रांतून आलेली संध्याकाळ :
जसं समुद्राच्या हातांत गिटार आहे आणि त्यांतून किनाऱ्यावर
फैलावत जातंय संध्याकाळचं गाणं.

किनाऱ्यावर आपल्या जुन्या आयुष्याचे कागद, बावलेलीं फुलं, पाचोळा.

भराभर शुभ्र फेसावर तरंगत जातंय तुझंमाझं
तुझंमाझं बोलणं न बोलणं एकमेकांत पाहणं...
आत्ता थोड्या वेळापूर्वी तुझीं पावलं ओल्या वाळूवर
चालत गेलीं माझ्या किनाऱ्यावर.
मी तुझ्या मनांत वाजणारा समुद्र.
एक तूंच ओळखीची आहेस मनुष्यहीन किनाऱ्यावर.

## कुमार गंधर्व ऐकतांना

१.

हे येतात स्वर
जसे देवतांच्या काळजांतून,
पवित्र होऊन जातात
आमचे गढूळ सूर्योदय,
मलूल सूर्यास्त.

२.

ह्या ईश्वरी शराबभट्टींतील
विलक्षण गहिरें मद्य
जातें जळत जळजळत लक्ष दिवे उजळत
आंत आंत;
होतात क्षणाक्षणाला बेहोष
संवेदनांचे अदृश्य डोळे
आणि टपटपतात
यातनांच्या अस्वस्थ फांद्या
आंत आंत.

३.

मी ध्यान करतों
माझ्या ऐंद्रिय सुखांचा बहर
आणि वळवतों सारे हंबर आंतल्याआंत
शुभ्र चांदण्याचे, रक्तवर्णी गुलाबपुष्पांचे,
सर्व नामोहरम आठवणींचे.

४.

मी झालोंय अस्वस्थ
या अनंत संध्याकाळच्या स्वरांनी...
सखीऽ मन लागेऽना...
ये इथे,
ये आंतून पिळवटून,
ये भुकेल्या श्वापदाप्रमाणे
आणि तुटून पड माझ्यावर;
तुझ्या तप्त लाल ओठांचे
व्रण उमटूं देत माझ्या काळजांत;
शोषून घे मला, उलथून टाक,
अगदी अस्ताव्यस्त कर;
ये एखाद्या साथीसारखी
आणि घे बळीं माझ्या क्षुद्र इच्छांचा.

५.

तुझे स्वर येतात
या स्वरांच्या पावलांवर पावलें टाकीत;
तू चालतेस माझ्यासमवेत
कोमल स्वप्नाप्रमाणे;
हें ओथंबलेलें आकाश...
मला इथून जाणवताहेत
तुझ्यांतील पाऊसधारा;
मी भिजलोंय खोलवर
कुमारच्या स्वरांसारखा.

# सर्वत्र ईश्वर भिनलेला आहे

सर्वत्र ईश्वर भिनलेला आहे अथवा विदूषक.

ह्या अक्षरांतून रोखलाय वेडसर डोळा तुझ्या उन्नत स्तनाग्रावर :
हे इंद्रियांचे जाहीरनामे, कसरीने खाल्लेले, डागाळलेले
उजाड प्रकाशाने उजाड परक्या ह्या शहरांतील उजाड संध्याकाळच्या.
सर्वत्र ईश्वर भिनलेला आहे अथवा विदूषक :
त्याला माझे हजार नमस्कार भुसा भरलेले.
आणि मी शोधतोंय वासनेच्या बेभान मस्तींतलें मर्त्य सूत्र
आणि अफाट लैंगिक प्रेरणेशी घाणेरड्या रस्त्यांचा संबंध;
पुस्तकें, फुलें, हातभट्टीची जळजळ, विशिष्ट माणसांशी जखडलेलें नातें,
नको असलेलीं शहरें, बुद्धिबळांतले हत्ती, काजळचुना फासलेले
राजाराणीदासदासी...
ह्या सर्वांपार शेवाळ जमत चाललें आहे
माझ्या आत्यंतिक प्रेयसीच्या खोल आठवणींवर.
आणि मीही होऊन गेलोंय एक नकली माणूस
देवाच्या भुसा भरलेल्या हातांतील
आणि मी माझ्या नकली डोळ्यांतून पाहतोंय
भुसा भरलेलें जग
भुसा जरलेलें भग.
प्रत्येक संध्याकाळ अथवा रात्र भुसा भरलेली.

सर्वत्र ईश्वर भिनलेला आहे अथवा विदूषक.

आणि ह्या भुसा भरलेल्या ग्रहांचीं संक्रमणें

आणि हे भुसा भरलेले कुंडलींतील योग :
प्रत्येक प्राण्याच्या मस्तकावर लादलेले भोग :
शनि सातव्या घरांत गुरू आठव्या
शुक्र सहाव्या आणि याचप्रमाणे वियोग भटकंती शोकान्त गृहजीवन
मानखंडना मूर्छा...
जन्माच्या विशिष्ट घटकेपासून मृत्यूच्या क्षणापर्यंत.
आता मला कंटाळा आलाय की मी सुटत नाहीं यापासून
हे वृद्ध जीवा !
—आणि कुणीही कुणापासूनच.
मी तूं शहरें अर्थहीन रस्तेसूर्यशनिमंगळकेतु
अर्थहीन माझेतुझे सर्वस्पर्शशब्दरंगगंध.
सुटत नाही कुणीच कुणापासून
आणि हा अस्वस्थ विदूषक परमात्मा
अस्वस्थ रंगभूमीवर म्हणतोय अस्वस्थ भुसा भरलेलीं गाणीं.

# एक विदूषक आत्महत्या करतो

आत्महत्या करण्यापूर्वी तो पाहतो
स्वतःच्या आंत आपल्या प्रेयसीचा चेहरा
आणि वाचतो लेबल मोठ्याने, म्हणजे ओठांच्या आंतच,
जालीम द्रवाच्या चिमुकल्या बाटलीवरचें.
दुसऱ्यांदा चाळतो सकाळचें वर्तमानपत्रः
आफ्रिकन राजकारणांतील नवटोळीवाद
अथवा जादूच्या आंगठीचे अद्भुत चमत्कार
आणि वगैरे
स्वतःशी संपूर्णपणे असंबद्ध.

तो निश्चितच थांबलेला नसतो
वाऱ्याच्या शेवटच्या झुळुकेसाठी
अथवा कुणाच्या खिडकींतील मंद उजेडांत
हलणाऱ्या फांदीसाठी.

मी नाकारतों सर्व माझ्यासह
सर्व किंवा कुणीही नाही
आणि मीच नाकारला जातों सर्वांतून

—त्याला चक्क भूक लागते
असले विचार मनांत येतांयेतां
आणि आत्महत्येचा गंभीर डोलारा
कोसळतो मिसळ-चहांत
अथवा शुभ्र कागदावरील

जाड झंझावाती काळ्या रेषांत.

आत्महत्या करण्यापूर्वी, हे तुच्छ विदूषका,
आधी केस विंचरून घे नीट
आणि चष्मा काढून
डोळ्यांत बांध जळजळता सूर्य.

तो म्हणतो स्वतःलाच उद्देशून
स्वतःची एक बेहद्द प्रतिमा कल्पून
आणि पाहतो स्वतःचाच चेहरा
स्वतःच्या आंत
उष्ण अश्रूंनी भिजलेला.

# मृगजळ

सगळे कावळे कुठे गेले. पूर्वी खूप असत. काळेशार.
समोरच्या शेतांत पन्नास बगळे होते. तेहि कुठे गेले.
दूर टेलिफोनच्या तारांवर चिमण्यांसारखे कांही पक्षी.
एकाकी. त्यांचा किलकिलाट. दुपारचा सुनेपणा अधिक वाढविण्यासाठी.
स्तब्ध. स्तब्ध. दूर झाडांची रांग. वेळूंचीं बनें.
ओकींओकीं. पिवळ्या पिवळ्या शेकाड्या.
ख्रिस्ती स्मशानाच्या कंपाउंडची भिंत. एखादा काळा पक्षी.
एकटा एकटा.
समोरच्या चकचकीत रुळांवरून फूत्कारत जाणारें एंजिन.
घरंगळत डब्यांची माळ. विलक्षण लोखंडी संगीत
दुपार पिळवटणारें.
आवाज ओसरत जातो. वाढलेला सुनेपणा.
दूरदूर उन्हाची जळजळ. मृगजळ.

## विशेषणें

कमळें फुललीं. काळीं कमळें फुललीं.
घोडा पळाला. काळा घोडा पळाला.
चार घोडे रथाला जोडले.
चार काळे घोडे काळ्या रथाला जोडले.
मीं हजार कमळें देवाला वाहिलीं.
मीं हजार काळीं कमळें काळ्या देवाला वाहिलीं.

दिवस मावळला.
काळा दिवस मावळला ?

# फणा

उग्र दगडी गुलाब
या रानटी जमिनीवर
करडा.
वारा फुंकून वाजवतो
इंद्रियांच्या बासऱ्या
तुफानी.
पिळवटलेल्या
आत्म्यावर
एकांताचा
फणा.

## सर्वत्र पसरलेलीं मुळं

वेटिंगरूम असतं.
तर वेटिंगरूम म्हणजे जांभईसाठी आ वासलेला जबडा
जांभईवर जांभईवर जांभईवर जांभई...
म्हणजे असंही म्हणतां यावं की वेटिंगरूम म्हणजे
परमेश्वराची अनंत जांभई.
तर परमेश्वर नसल्यास प्रश्न पडेलच की कुणाची,
तर जगणंच जांभई झालं.

या समोरच्या माणसाचा मुर्दाड चेहरा पाहून
मला राग येत आहे.
त्या पलीकडच्या बाईची वटवट ओकारी आणते आहे.
हा म्हातारा मध्येच घाणेरडं थुंकतो.
कितीतरी हे घाणेरडे कुरूप असुंदर सुंदर नाक कान डोळे हातपाय
पसरून, गाठोडीं बांधून, माणसं कातावून वाट पाहणारीं.
वेटिंगरूम नरक आहे.
कल्पना करा, नरकांतल्या कुठल्यातरी स्टेशनांतील वेटिंगरूममध्ये
आपण गाडीची वाट पाहत बसलों आहों.
कुठली गाडी येईल, कुठं आपल्याला जायचं असेल,
माणसं उतरतील पसरतील पांगतील कुठं कुठं जातील.
आता हीं माणसं कुठंतरी जातीलच.
कारण त्यांच्यासाठी गाडी आहे.
नाहीतर कशाला मरायला तीं या वेटिंगरूममध्ये
अशीं टरफलासारखीं बसतील? बसतीलही.
कशासाठी काय कुणी कुठं बसावं

असलं काही ठरवण्याचा मला अधिकार नाही.

ती पलीकडची सूटकेस माझी नाही आहे.
तो पोचे आलेला डबा माझा नाही आहे.
इथली कुठलीही वस्तू माझी नाही आहे.
हें खरं म्हणजे मीं निक्षून सांगायला पाहिजे.
कारण हेंच की तें केळ्याचं सालदेखील माझं नाही आहे.
मी एकटा आहें, संपूर्णपणे एकटा आणि हीं वाट पाहणारीं माणसं.
देव त्यांची गाडी लवकर पाठवो
म्हणजे मग हें वेटिंगरूम निरपेक्ष शून्य होईल,
हें वेटिंगरूम आहे हें मी विसरेन,
मी कांही विसरतों आहें हेंही मी विसरेन;
मला या आ वासलेल्या जबड्याचा साक्षात्कार करून घ्यायचा आहे.

मीं थोडा वेळ डोळे मिटले
एवढ्यांत एक राक्षस येऊन गेला, अर्थातच स्वप्नांत.
स्वप्नांत कांहीकांही येतं, उदाहरणार्थ : मुंगी राजवाडा मरण डुक्कर फुलं वगैरे.
माझी झोप म्हणजे एक वेटिंगरूमच.
आता या वेटिंगरूमला कसलीं स्वप्नं पडत असतील ?
हें एक रहस्यच आहे आणि रहस्यं हीं कूट असतात
आणि रहस्यं भेदणार की जेवणार झोपणार,
म्हणून सगळीं रहस्यं अशीं कूटच राहतात,
शिवाय आपलं हें शरीर...

माझं शरीर रोग्याचं आहे
आणि मला कुठला रोग झालाय हें डॉक्टरला माहीत नाही.
डॉक्टरदेखील रोगग्रस्त आहे.

इतकंच काय, पण दवाखान्यातलं नटीचं कॅलेंडर रोगग्रस्त आहे,
असं मला दवाखान्यांतल्या बाकावर बसल्याबसल्या सुचलं.
तें समोरचं झाड रोगग्रस्त आहे,
हें सकाळचं ऊन रोगग्रस्त आहे,
असं बरंच कांहीकांही सुचलं :
किंबहुना, कांही सुचणं, विचार करणं हेंदेखील रोगग्रस्त,
वाचणं, बोलणं, येणं, जाणं. जशी ही
एक मुलगी येते.
ही मागच्या जन्मीं राजकुमारी असेल की घोडी की माशी की...,
शक्य आहे की मागच्या जन्मीं ती माझी आई असेल.
किंवा मागचा जन्मही नसेल,
नुस्ता काळोख असेल, नुस्ता उजेड असेल.
माझ्या या दोन डोळ्यांना आत्ता फक्त दिसतेय एक मुलगी.

मुली, तुझी गाडी कुठली आहे,
कुठल्या रोगाचं स्टेशन तुझं आहे.
तुझीं स्टेशनं फुलांचीं असतील.
नसतील तर असोत.
स्टेशनमास्तरसाहेब, या मुलीला फुलांच्या स्टेशनाचं तिकिट द्या.

फुलांचं शहर सुंदर असेल.
तिथं रस्त्यारस्त्यावर फुलं.
आमच्या शहरांचे चेहरे मळकट आणि उदास.
मला हे चेहरे धुवायचे आहेत,
पण ही माझी इच्छा अशक्त आहे.
मी स्वतःच असं एक पुष्पपात्र आहें की ज्यांतलीं फुलं अचेतन.
माझ्यांतलीं हीं बावलेलीं फुलं काढून ताजीं फुलं ठेवणारे

मी असं भावविवश व्हायला नको.
तरी बरं की सवय म्हणून डोळे कोरडेच.
डोळे कोरडे ठेवायला शिकणं हें आयुष्यांतलं सर्वश्रेष्ठ यश आहे.
कोरड्या डोळयांनी कोरड्या जगाकडे कोरडेपणं पाहावं;
म्हणजे कोणालाही कळत नाही मग तुमच्या शरीरांत
मनांत आत्म्यांत कायकाय घडतं आहे, कसली उलथापालथ,
कसले कंपभूकंप.

माझे तळहात ओले झाले आहेत घामानं,
तळपायही झाले असतील.
आता जीभ टाळूला चिकटली आणि
डोळे फिरले की झालंच.
मी मृत्यूला भीत नाहीं.
मी वृत्तपत्र वाचतों आहें.
मी बसलों आहें.
तो निळ्या शर्टांतला माणूस पोर्टर आहे.
पोर्टर चहा पीत आहे.
तीं पलीकडचीं माणसं माकडासारखीं हसताहेत.
मला प्रत्येक माणसांतलं माकड आजकाल जाणवतं,
आणि मला सपाट भिंतींची भकासता जाणवते,
आणि कोणत्याही वस्तूचे दृष्टिकोण जाणवतात.
त्या समोरच्या माणसांतल्या माकडाचा गळा आवळलाय :
मला त्या आक्रांताच्या वेदना जाणवताहेत.
त्या दुसऱ्या माणसांतलं माकड अश्लील ओरडतंय.
तें समोरचं टेबल हळूहळू आकसतंय,

पुन्हा झाडांत मिसळून जाण्याची इच्छा धरतंय.
पण बेस्या टेबला, तूं असाच झिजत मोडत संपणार.
तुला एक सामान्य आकार सापडलाय हें वाईट नाही.

मी कोण आहें.
मला माझा आकार नाही.
मी अमीबा की राक्षस की वेटिंगरूम की रोगग्रस्त की काय.
माझा हात आता वितळला.
हीं स्वच्छ शुभ्र हाडं.
या हाडांवर हें हिरवं गवत येतंय.
आता मी कीटक झालोंय.
आता मी हत्ती झालोंय.
आता मी जाडबुटका झालोंय.
आता हा माझा जबडा अनंत योजनं पसरत चाललाय.
आता मी पापी आहें.
आता मी प्रेषित आहें.
आता माझे ओठ गच्च आवळलेले आहेत.
मला खूप सांगायचं आहे.
मला सांगतां येत नाही आहे.
मला काय सांगायचं आहे.
मी कोण काय सांगणार आहें.
मी कसं काय कुठं सांगणार आहें.
माझी छाती काळी पडली आहे.
सावली काळीं असते.
रात्र काळीं असते.
घागर काळी असते.
यमुना काळीं असते.

कविता काळी असते.
माझ्या डोळयांचीं बुबुळं काळीं आहेत.
हीं...
या विशिष्ट क्षणीं मी काळ्या नदींत वाहत चाललोंय.
माझे हातपाय थकले आहेत.
मी असाच वाहत जाणार आहें.
जेथे नदीचं पाणी संपेल
त्या रेताड जमिनीवर माझं शव असेल स्वच्छ उघडं.

तर प्रत्येक माणसानं शव उघडं ठेवावं,
असा या स्मशानाचा स्पष्ट नियम आहे कां की वगैरे.
एक अवाढव्य डोळा :
मी उघडा पडलोंय या डोळ्यासमोर,
माझं प्रत्येक इंद्रिय या अवाढव्य डोळ्यासमोर,
आणि माझीं इंद्रियं पोखरणारे कीटक.
या डोळ्याला चेहरा नाही.
नुस्ताच भकास डोळा ठेवलाय अदृश्य धडावर.
कधी फुटतो अदृश्य हात या अदृश्य धडाला.
उंच उभारला जातो अदृश्य अजस्र पंजा,
ज्यांत असतो आणखी एक गरगरता डोळा.
तो पंजा हाकारतो, रोखतो वादळ.
या एका पंजाच्या इशाऱ्यानं
वेगानं वाहूं लागतात नासाडीचे झंझावात.
मला दिसताहेत आत्ता त्या अवाढव्य पंज्यासमोर
हतबल क्षुद्र जनावरं.
या वेटिंगरूममध्ये बसलेलं हेंही एक क्षुद्र जनावर.
हे अदृश्य धडावरच्या अदृश्य पंज्या,

हाकार तुझ्या उन्मत्त वादळांना.

मला तहान लागली आहे, भयंकर तहान लागली आहे.

जें हृद्‌यांत आहे तें हातांत असावं.
जें हातांत आहे तें
हातांत नाही आहे.
माझ्या हातांत कांहीच नाही आहे.
कुणाच्याही हातांत कांहीच नसतं.
जें हृदयांत असतं तें हृदयांतच मरतं, सडतं, कणकण विखरून नष्ट होतं.
नष्ट होण्याच्या यातना पसरतात शरीरभर.
एक विचित्र थकवा पसरलाय माझ्या देहांत.
मला माझा प्रत्येक अवयव जाणवतो.
त्याचं थकलेलं वेगळेपण जाणवतं.
मीं कुणाशी झुंज घेतली, कुणाशी लढलों,
कुणाशी युद्ध करून असा घनघोर थकलों आहें.
वेटिंगरूमच्या निर्दय थंड फरशीवरून एक मैना फिरतेय.
पिंगट चोच आणि पिंगट राखी पंखांचा एक चिमुकला थकवा,
एक विलक्षण एकाकी थकवा.
या मैनेला उत्तर माहीत नाही.
तिच्या चोचींत एखादा दाणा अथवा तोही नाही.
हें ओसाड ओसाड वेटिंगरूम
आणि एकाकी मैना.
आणि एकाकी मैना म्हणजे दुःख,
जें आपल्या मांसांत हाडांत रक्तांत
आपल्या असंख्य पिंगट चोची खुपसत राहतं.
आणि आपण त्या चोची नाकारूं शकत नाहीं,

आपल्या हातांत तेंही नसतं.

आणि ज्याच्या हातांत हें सारं असेल
तो कोण तें कुणालाच माहीत नाहीं.
आपले सगळे शब्द अपुरे अर्धवट असतात.
आपण यातनांचं आणि आल्हादांचं भाषांतर करतों.
ती आपली भाषा असमर्थ असते.
आपलं शरीरही या अनंत पोकळींचा वेध घेऊं शकत नाही.
मीं माझ्या आयुष्याचा जॅझ-अवर अनुभवलाय
आणि मीं सूर्यफुलांचे दिवस पाहिले आहेत.
मी जॅझच्या तीरावरच राहिलों,
मी सूर्यफुलांच्या अलिकडेच राहिलों.
मीं जॅझचा उन्नत आर्त स्वर होऊन जायला पाहिजे,
माझ्यांतूनच सूर्यफुलं उमलायला पाहिजेत.
पुढे येणारा एकेक क्षण मागल्या क्षणांत मिसळून जातो,
त्या प्रत्येक क्षणीं मी अनिश्चित असतों.
माझीं पावलं अस्थिर असतात.

अशी विराट प्रारंभयात्रा चाललेली आहे.
अगणित माणसं माना खाली वळवलेलीं चाललीं आहेत मुकाट्यानं.
हा कशाचा प्रारंभ आणि कोणती दिशा माहीत नाही कुणालाच.
असा प्रत्येकाचा दिवस कां सडतो, रात्र कां मरते,
आयुष्याचं असं वेटिंगरूम कां होतं,
असे अनेक प्रश्न आणि समस्या आणि शंका आणि किंतु.
आत्ता मला असं वाटलं की मी म्हणजे वारूळ,
आणि खूपखूप मुंग्या भराभर आंतबाहेर जातयेत आहेत,
आणि प्रत्येकाच्या चेहऱ्याकडे पाहूं लागलों की

वेटिंगरूममध्ये हें वारूळ कसं म्हणून कुणाच्या चेहऱ्यावर शंका दिसते का.
तर हीं सगळीं मुर्दाड माणसं जगताहेत सगळे प्रश्न विसरून.
तो एक माणूस प्रश्नाला धक्का देऊन पुढे निघून गेला.
ही स्त्री किंतूंचे गळे आवळून हसते आहे निर्लज्जपणे.
हा चिरलेल्या आवाजाचा क्षुद्र भिकारी
सर्व समस्यांचे खून करीत निघालाय.
मला त्याच्याकडे पाहवत नाही.
कुठल्या चिवट दोरीनं याला जखडलंय या जमिनीशीं.
एकेक बोट याचं गळून चाललंय :
गळलेल्या बोटांनी हा अन्न खात असेल,
गळलेलीं बोटं घेऊन संभोग करीत असेल,
गळलेल्या बोटांतून शरीराचे सारे गळत असतील
अनावर आवेग उद्वेग,
जशा ह्या माझ्या गळताहेत आशाआकांक्षा,
जसं हें माझं प्राक्तन गळतं आहे
या अनौरस वेटिंगरूमच्या उजाड फरशीवर.
हें सातत्यानं गळणं मी थांबवूं शकत नाहीं.
मी फक्त पापण्या डोळ्यांवर ओढतों.
झाकलेल्या बुबुळांनाही शांति नाही.
परमेश्वराचं चिंतन बेंबींतच आटून गेलंय.
हें उसवलेलं कातडं धारण करणाऱ्या क्षुद्र श्वाना,
तुझ्या गळ्याचा पंचम लागूं दे.
तुझ्या कर्कश चिडखोर भुंकण्यांत मिळेल मला माझा स्वर्ग,
युगायुगाचं शाश्वत क्रंदन
ठिकऱ्या होऊन पडेल येथे,
येथे या मृत इच्छांच्या घाणेरड्या गर्दीत.
हें माझं येरझारा घालणं,

हें माझं असं जाणं आणि येणं,
हें माझं प्रत्येक पाऊल,
असं विफल.
असं क्षणाक्षणानं नष्ट होऊन जाणारं.
हें असं नश्वर जीवन खांद्यावर घेऊन चाललाय प्रत्येक पशु.
कोण देतं सुखाचे क्षण आणि कोण ओरबाडून टाकतं आणि कां.
मी प्रश्न विचारतोंय हे मख्ख चेहऱ्याच्या घड्याळा
आणि मला उत्तर हवंय.
मी याचना करीत नाहीं की करुणा भाकत नाहीं.
आणि मला न्यायही नको आहे.
कारण कोणीच कोणाला न्याय देऊं शकत नाही.
मी हे मगरूरपणे बोलतोंय.
घड्याळाचे काटे मगरूरपणे फिरताहेत.
मगरूरपणे एक दिवस संपेल,
तरीही शिल्लक राहतील सारे मगरूर प्रश्न.

आता सारं निरुपयोगी आहे असं मला वाटलं.
हें माझं असणं, प्रश्न विचारणं निरुपयोगी आहे,
हें प्रत्येक क्षणींचं थरारून जाणं,
यातनांनी हादरून जाणं,
हें सारं निरुपयोगी आहे असं मला वाटलं.
प्रश्न निरुपयोगी आहेत, उत्तरं निरुपयोगी आहेत,
असं मला वाटलं.
या मनुष्यलोकांत सर्वत्र पसरलेलीं आहेत मुळं
निरुपयोगीपणाचीं.
मी इथं नको आहें.
हें वेटिंगरूम इथं नको आहे.

हें माझ्या डोळ्यांना दिसणारं, कानांना ऐकूं येणारं, त्वचेला स्पर्शणारं,
कांहीही इथं नको आहे.
आणि तरीही हें सारं आहे.
असण्याचा नाकारतां न येणारा शाप
मी भोगतोंय माझ्या असण्याच्या प्रारंभापासून;
आणि माझं असणं मला नाकारतां येत नाहीं,
आकारतां येत नाही.
जें मला झंझावातासारखं वाटतं,
त्यानं कुठलंही पान हलत नाही.
हें रक्ताळलेलं आयुष्य अधिकच रक्ताळत जातं
आणि हात रिक्तच राहतात
निरुपयोगीपणानं जड झालेले.

# कीटक

ईश्वर हा एक
प्रचंड कीटक आहे
माझ्या मनाची प्रसन्नता खाऊन टाकणारा.
मी जरा आनंदानं हसलों की
माझ्या कपाळावर उडी मारतो हा;
त्याच्या चमकदार काळ्या पोटाखाली
अगदी झाकून जातात माझे डोळे.
मी दोन्ही हातांनी ओरबाडून
काढून फेकण्याचा प्रयत्न करतों
पण त्याच्या तीक्ष्ण नख्या
मेंदूपर्यंत पोचलेल्या असतात माझ्या.
मी जणू ईश्वरी कीटकाचं धान्यच आहे :
त्यानं यावं,
आपण खा म्हणावं !

## दाभाडे

मी पाहतों माझ्या पिढींतील शिक्षित मस्तकांच्या चिंधड्या उडतांना.
वेडसर वेडसर बेकारी क्षुधित घृणास्पद नग्न.
प्रचंड दुर्दम्य शक्तींचीं चक्रें गरगर फिरतात फिरतात मेंदूंत,
कापीत जातात सर्वत्र हाडें आणि मांस चामडें शरीरावरचें.

दादा दाभाडे : मी पाहतों त्याचा चेहरा क्षयी किरणांत,
करुणनाट्यांतील नायकाच्या चेहऱ्यासारखा त्याचा चेहरा.
मेंदूंतून उतरून डोळ्यांत जमलेलें रक्त :
विश्वाचें आत्मपीडन. काळें त्रस्त रक्त.
समग्र अस्तित्वाची एकाग्रता प्रवाहित
चेहऱ्यावरच्या चामड्याखालून वाहणाऱ्या रक्तवाहिन्यांतून.
तो जबडा उघडतो. प्रत्येक नस ताणलेली.
कवटीच्या विचकलेल्या दातांसारखे त्याचे दात.
आणि अजस्त्र स्वगत बोलत जातो कोसळत्या स्वरांत :
शरीराचे तुकडे तुकडे करून त्याचा खिमा लोकांना खाऊं घालायचा.
भूत होऊन झपाटून टाकायचं साऱ्या विश्वास...
वैताग वैताग. उद्विग्न. बीभत्स. अनावर चीड.
वैताग वैताग धमन्यांतून सळसळणारा...

मी पाहतों माझ्या पिढींतील शिक्षित मस्तकांच्या चिंधड्या उडतांना.

## बिऱ्हाड

बिऱ्हाड दोन दिवसांचं
तसं एकटंच
जमावांत जायचं कधीमधी
तसं रोजच
गायचंही
मुख्य म्हणजे शिव्या द्यायच्या
शिव्या देतां याव्या
म्हणूनच समाजनिर्मिति झाली आहे
तर शिव्या वगैरे द्यायच्या
अर्ध्या स्वतःला
अर्ध्या नशिबाला, अर्ध्या याला, त्याला
थोडंसं गंभीर व्हायचं
वर्तमानपत्र चाळायचं
हवापाणी पाह्यचं
भविष्यही कुणाचं लक्ष नाही असं पाहून
वाचून घ्यायचं
सगळं लक्ष स्वतःत
म्हणजे आपण आत्ता या वेळीं कसे दिसतों
इथपासून आत्ता मरूं की काय इथपर्यंत
तर आरसा बसवलेल्या पलंगावरच
दिवसरात्र पडून राहावं
लोकनीति, शास्त्रीय प्रगति वगैरे
गेली उडत
पण रोज संध्याकाळीं भाजी आणणं

कुणाला कधी चुकलं आहे काय ?
म्हणजे मला म्हणायचं हें आहे की...

# लोकशाही वगैरे

असंख्य सांगाड्यांचे उंच उभारलेले हडकुळे हात → निःशस्त्र, निशस्त्र शस्त्रहीन' more
आणि तापलेल्या जमिनींत रुतलेले
साखळदंडांनी जखडलेले हडकुळे पाय.
कुणाच्या तरी जयजयकाराचा सैतानी जल्लोष
अवकाशाच्या पोकळींत घुमणारा आणि निःशेष होत जाणारा.
गुलाब झडूं लागले आहेत महारोगी सूर्यकिरणांनी
तरी सांगाडे उभेच आहेत शतकांच्या कोंडींत सापडून
श्वास बंद झालेले...

Samadhimati

## रोमन हॉलिडे

मदांध राज्यकर्त्यांच्या पाशवी वासनांचा मनोरंजक खेळ
तुम्हीं पाहिलात भर चौकाच्या ओपन एअर थिएटरमध्ये
आपलें हृदय मुठींत धरून अथवा सेफमध्ये ठेवून;
तुमचें रक्त सळसळलें नाही, हात उंचावले नाहीत
तडफडतें बंडखोर रक्त रस्त्यावर सांडलेलें पाहून;
भव्य झगझगत्या तीक्ष्ण पात्यांकडे
तुम्हीं निमूट साहिलें दगडी डोळ्यांनी एकाग्र पाहात;
भयाण विकृत मौन तुमचें,
जिभाच समूळ उखडून काढल्या आहेत जशा;
तुम्ही दडून बसलांत घरांत दारें बंद करून
या महान नरमेधाच्या उत्सवदिनीं;
तुमचे आक्रोश आणि तुमचे आनंद गोठून गेले
या शतकाच्या ज्वलंत शोकनाट्याने.
सारे रस्ते उजाड उजाड,
किम्बा आणि जेरोमच्या रक्ताने न्हालेले.
तुम्ही गा, नाचा, मद्याच्या बेहोषींत धुंद होऊन राहा.
ईश्वराचा खून केव्हाच झाला आहे,
आणि गुन्हेगार फरारी.
तुम्ही सर्व गुन्हेगार सभ्यतेचे पायघोळ झगे घातलेले,
रक्तमाखल्या हातांनी संस्कृतीचे वेद टाइप करणारे,
सैतानाचे अनौरस पुत्र.
विश्वाच्या प्रत्येक चौरस्त्यावर तुमचे उन्मत्त दूत
नाचताहेत नग्न नररक्त पिऊन.

हे लाकूड तोडणाऱ्या, पॉलिश करणाऱ्या,
रिक्शा चालवणाऱ्या अत्यंत सामान्य माणसा,
जागृत होऊ दे तुझ्या अंतःकरणांतील वादळांचे समुद्र.

## सळसळ

ताणलेले रबरी चेहरे
सुरकुत्या पडलेले.
डोळ्यांपुढे आकारतोय रम्बा.
लालहिरवे उजेड.
कोलिनॉस हास्य. हॉटेल्स.
बुडाखाली अणुचाचण्या.
डिप्लोमॅटिक कुजबूज.
ढुंगणं.
सुरकुत्या पडलेलीं रबरी ढुंगणं.
नाद आणि जल्लोष.
दाराशी मोटारींचीं खूळीं गाढवं.
कुदळीनं खणणारे भविष्यवेत्ते.

झिंगलेल्या झाडांची सळसळ.

# अभाग्याचें भाग्य

अभाग्याच्या सांगाड्यांत घुमतें मरणाचें हास्य
तेव्हा आढ्यावरच्या पाली दचकून पडतात फरशीवर उताण्या,
तेव्हा शहराच्या ओसाड सडकांवर
खवळून भुंकतात बेवारशी कुत्रीं.

अभाग्याच्या भाग्याची ही एवढीच साथ.
बाकी क्षेम.

अभाग्याच्या जीवनगीतांच्या चोपडींत
किरटीं अक्षरं आणि पालींचीं अंडीं.

# आमचे सलग जन्म

केस गळतात बलाढ्य झाडांचे
आमचीं वर फिरलेलीं नाकं पाहून.
आम्ही वियांनी भरलेलीं गचाळ माणसं
स्क्रू घट्ट पिळल्यासारखं बोलतों
आणि खाली
        खाली
        उतरत जातों
        रेतजंतुरहित गर्भाशयांत.

येईल म्हणे एक दिव्य पेरणीचा हंगाम
या नालायक झाडांसारखा
केस गळणाऱ्या.

तेव्हा आमचे सलग जन्म
हेलकावतील
एकदाच आणि कायमचे.

23-09-1974
दा. क. 28599

## सुरेशचा बाप

रोखून वेडसर डोळे सुरेशचा बाप आपल्यांतच
मुळें रोवून पसरलेल्या जंजाळांत,
भिंतीवरून जमिनीवरून सरसरणारे बारीक किडे
चिरडत राहतो टाचांनी तासन्‌तास.
पेशीजाल पिंजून टाकणारें हास्य
वेटोळें घालतें त्याच्या उजाड वासलेल्या डोळ्यांत.
थरारणारे पंजे.
तटतटा नसा.
वेचून टोचूं पाहतो बारीक किडे त्वचा सोलून
आपल्याच धारदार नखांनी.
हा बुडवतो आपलें शरीर, आत्मा,
बुडवतो आपल्या त्रस्त अस्तित्वाच्या सगळ्या मागण्या
मृत्यूच्या क्षीण प्रवाहांत.
सुटूं पाहतो ईश्वरी पालीच्या सर्वात्मक तडाख्यांतून.

चिकट काळोखाचा पातळ पडदा
बसवतो ताणून
खाचांवर धुमसत्या डोळ्यांच्या.
पिवळा उदास काळसर उजेड
झरतोय बुबुळांत.
दारावर पाल
वितळून पसरवते एकेक अनाकार.
त्याला एका जागीं बांधून ठेवणाऱ्या,
जड करून टाकणाऱ्या सहस्र भूकनलिका

वळवळताहेत अस्वस्थ आंतल्याआंत.
सुरू आहे अपरंपार दळण
अगाध परमेश्वराचें हाडाहाडांमध्ये.
होतोय हाडांचा चुरा
दिवसच्या दिवस, रात्रीच्या रात्री.
पालीच्या डोळ्यांसारखा
अंध काळोख सूकनलिकेंतील
चाचपतोय सर्व बाजूंनी चक्षु चक्षु खुपसत.

सुरूच आहे अगम्य दळण,
मूळापासून तुटतोय रक्तरज्जु.
घरघरतें जातें अनाकलनीय अस्तित्वाचें,
पाउलावर पाऊल.
अस्ताव्यस्त सूर्यांसारखी
विस्तीर्ण पोकळींत भरून राहिलीय
या अमानुष दळणाची घरघर घरघर.

भोगत राहतो किडे चिरडत सुरेशचा बाप
चीत्कारत
ब्रह्मांड गोठवून टाकणारें
आरपार.

## झिजलेले योद्धे

झिजलेले योद्धे
जेव्हा शरण जातात पोटांतील लांडग्यांना हैराण होऊन
तेव्हा फाजील किंमत सांगतात
डोळ्यांत तेल घालून वाट पाहणाऱ्या कळसूत्री चटकचांदण्या,
सफेत चलाखीने टाळेबंदी पुकारतात
आत्मिक हॉटेलसचे पूयस्रावी मालक.
झिजलेले योद्धे
जेव्हा रस्त्यारस्त्यांतून फिरायला लागतात
तेव्हा मठ आदेश काढतात तद्देशीय होयबा
धास्तीच्या झुलत्या खुर्चींत बसून.
सर्वत्र उगवून येतात कर्फ्यूंच्या नागफण्या
सक्तीच्या काळोखांत.

मुठीएवढा होतो एकेक डोळा
झिजलेल्या योद्धयांचा.
मोकाट सोडून देतात ते पोटाचीं दारें उघडून
रक्तपाती लांडग्यांना.
तेव्हा कोलमडून पडतात बाजारबुणग्यांच्या
भित्र्या घोड्यांसारख्या पिचपिच्या आकांक्षा;
आकस्मिक हल्ल्यांच्या नियोजित नकाशांचीं लक्तरें
लोंबत राहतात ओसाड मनोऱ्यांत;
अतिभव्य खच्चीकरणाची प्रयोगशाळा
उध्वस्त होते क्षणार्धात
जेव्हा तुटून पडतात पोटांतील आक्रमक लांडगे.

हे पंख उखडलेले योद्धे
जेव्हा चढाईकरता झेप घेतात,
वाऱ्याचे अमानुष झोत
वाहून नेतात त्यांचे तळतळाट सर्व दिशांना.

## बेइमान भूमीच्या शोधांत

चीत्कारत बाहेर येतात
एकाएकीच थडग्यांतून
तुटलेले, सांधा उखडलेले संतप्त आत्मे.

ते येण्यापूर्वीच
त्यांच्या नांवांवर
लटकलेलीं असतात बीभत्स पोस्टरं
विश्वासघाताचीं, निमकहरामीचीं
ड्रेनेजसारख्या घाण वाहणाऱ्या गल्लीबोळांत.
हवेंत फैलावलेले खिन्न भयाण
कुजक्या मनांसारखे बाटगे द्रोह.

येतात विंचवाच्या नांगीसारखे
कडाडते आत्मे,
छेदून टाकतात बांडगुळी कायदे, नियमांचे खोडे.
त्यांच्या हातांत असतात
दहशतीचे पेटते पलिते,
ज्याच्या लाल प्रकाशांत थरकापतो
कोनाकोपऱ्यांतील काळोख;
हिंमत खचते रक्तपिपासु जळवांची.
ते येतात बेइमान भूमीच्या शोधांत
आणि तोडतात शरीराचे अवयव
जीवनव्यापी दुर्गंधाच्या;
सोडवतात गहाणांतून स्वतःला

हे अवज्ञा करणारे, आज्ञाभंग करणारे
बेछूट मवाली आत्मे.

दुखवतात, गोंधळ माजवतात
रोगआजार उत्पन्न करतात, बंडाळी करतात
हे दंगेखोर शिस्तहीन आत्मे.
घडी मोडतात, विस्कळीत करतात,
नाकारतात, त्याग करतात,
तुच्छतापूर्वक बोलतात,
उद्ध्वस्त करीत जातात,
आणि पसरतात, पांगतात
झंझावातासारखे.

हीं विलक्षण स्थानान्तरें, स्थलान्तरें
एकाएकी थडग्यांतून बाहेर येणाऱ्या
संतप्त आत्म्यांचीं.

## उत्तरार्ध : विसाव्या शतकाचा, माझा

मृत फुलांनी बहरलेल्या आहेत रक्तक्षयी वृक्षांच्या डौलदार फांद्या:
मृत्यूचा एक-एक थेंब सरकत सरकत येऊन
टपकत आहे खाली चेतनाहीन पानांवरून.
संहारक देवतेच्या लालभडक डोळ्यांप्रमाणे हें आकाश
आणि तडकलेल्या जमिनीप्रमाणे फाटून गेला आहे
माझ्या डोळ्यांपुढचा सारा अवकाश.

माझ्या अंतरांत होरपळताहेत स्वर,
कासावीस झालेले आहेत माझे प्राण.
लोटून दिलेलें आहे मीं माझें थकलेलें शरीर
सर्वत्र भेगा पडलेल्या जमिनीवर.
त्या जमिनीशी कान भिडवून मी ऐकत आहें
ओसाड ओसाड संध्याकाळ.
भयाण संगीत शतकांच्या सांगाड्यांमधून गरगरत जाणारें.
रक्तवाहिन्या फुटतात इतिहासाच्या
आणि समग्र संस्कृतीचीं कलेवरें कोसळून पडतात हिंस्र काटेरी कुंपणावर.

वाऱ्यावर भिरभिरणारीं सामान्यांचीं नश्वर आयुष्यें
मी नगण्य, मी सर्वस्वी शक्तिहीन धरूं पाहतों
दोन्ही हात आकाशापर्यंत पसरून.

# बरणींतला महामानव

या ओतीव पारदर्शक बरणींत
या शतकाच्या
ठेवलाय एक लोकोत्तर पुरुष.
या रांगेंतील एक-एक बरणींत एक-एक महापुरुष.
कुमारिकेच्या डोळ्यांप्रमाणे ज्यांचें चारित्र्य
शुद्ध अस्खलित,
त्यांच्या उभारलेल्या हातांच्या रेषांत
सुगम शांतिप्रद मार्ग.
हे दुःखितांनो, पीडितांनो,
येथे या आणि या महामानवांच्या दर्शनाने पवित्र व्हा.

कृपया शांतता पाळा.
येथे थुंकूं नका.

बरणींतल्या महापुरुषाच्या दर्शनार्थ
जमते अफाट जनता
जी पिंजऱ्यांतला पोपट पाहते,
गजांआडचें भिकार अस्वल पाहते,
ती जड थंड शांत जनता,
क्षुब्ध अस्वस्थ अशांत जनता
पचवते मख्ख डोळ्यांत
आणखी एक महापुरुष.

मी एक बरणींतला महापुरुष.

माझ्या भोवतीची ही निर्वात पारदर्शक तटबंदी,
ही अभेद्य भिंत.
मी गुदमरतों,
मी तडफडतों
आंतल्या आंत कुढत राहतों,
मी अस्थिर फिरतों या काचेच्या बरणींत.

या पदार्थसंग्रहालयाचा मख्ख व्यवस्थापक / ईश्वर.
गहाळ झालाय हल्लीच.

## जन्म

बियांचं टरफल असा एकेक जन्म
अलगद सोलला गेला,
उचलला गेला दरवेळीं देहावरचा जाळींदार पडदा.
सर्वत्र पसरलेले अनंत निर्हेतुक हात,
सर्व बाजूंना उगवलेले डोळे, वासलेले जबडे,
नाक कान पाय.
असंख्य शरीरं दिलेलीं
अदेय हातांनी आकारलेलीं.
आणि माझ्या देहांतून विस्तार पावलेले हे अनंत तृषित बाहू.
रिक्त आहेत हे अत्यंत ताणलेले निष्क्रिय पंजे,
ओसाड नगरांतून फिरलेलीं थकलेलीं पावलं.

## माझ्या लोकांचा आकांत

मनुष्य पिंजण्याचं यंत्र हातांत घेतलेलीं हीं माणसं,
बिनसरकीच्या कापसासारखं ज्यांचं आयुष्य :
कोसळतात त्यांच्या आ वासलेल्या जबड्यांतून
बोबड्या शब्दांमधलीं भाकितं.
मी, त्यांच्याच आसपास कुठेतरी, बावळटासारखा हाताळतो
सामान्य लोकांमधला पांगळा विद्रोह.
या माझ्या हातांतील वृत्तपत्रांतून
खिदळत येते एक खुनशी पिढी;
गढूळ, चिखलानं भरलेलं शाळेंतलं शिक्षण
पोतलेलं जिच्या खुज्या खांद्यांवर, अरुंद मस्तकांवर
ही चामखिळासारखीं निर्हेतुक विद्यापीठं,
कोंदट विचारांच्या बैठ्या चाळी,
मानवी आकाराचं लाकडी फर्निचर कुजायला आलेलं.
The entire structure of society
must be demolished
before a new and better one could be built.
दहशतीची गोळीं घेतलेले हे जर्जर सम्राट,
पोटभर अन्न न मिळालेले,
शिंगं खुपसतात आपल्याच पायाखालच्या मातींत
तेव्हा गळून पडतात
सभ्यतेचे कुजलेले अलंकार
पिढ्यान्‌पिढ्या जोपासलेले.

## मातीचं शास्त्र

या देशाच्या मातींत सोनं उगवतं.

पानं गळलीं.
चिखलांत रुतलेलं हें एक झाड.
या चिखली जमिनीच्या आंत
खोकणारं बेडूक एकटंच असेल जागं :
त्याच्या माथ्यावर लहानसा मुकुट :
राजा वगैरे...
समोर
माती खाऊन सुस्त पडलेलीं दहावीस बेडकं.
इथंतिथं विखुरलेलीं शंभरेक छोटींछोटीं थडगीं.
या झाडाच्या सालीच्या आंतही
एक सूक्ष्म जंतूंचा देश :
न्यायालयं, मंदिरं, जन्ममृत्युनोंदकार्यालयं,
भ्रष्टाचार, लाचलुचपत इत्यादि.
या झाडाचीं मुळं
जमिनींत खोलवर
अशीं नरकापर्यंत गेलेलीं.

प्रेषित, १९६९ :
गर्भात पाणी झालंय.
तळहाताएवढा खंदक.
टोपलीभर माती.

## बाजारपेठ

सडक्या भाज्यांचे, गाढवाच्या मुताचे वास येतात
बाजारपेठेंत वावरणाऱ्या या इसमांना.
देवदूत किंमत चार आणे, राक्षस किंमत आठ आणे,
लहान जवळ्याचा राक्षस फुकट मिळेल
पांच रुपयेवाल्या महात्म्यासोबत.

चिरक्या चरफडत्या आवाजांतली सौदेबाजी.
गटारांतून वाहतेंय काळ्या काळजाचें पाणी.
हा फाटलेल्या कातड्याचा म्हातारा
धार्मिक ग्रंथांची झोळी घेऊन हिंडतोय अनवाणी रस्त्यावरुन
भरदिवसा माझ्या उघड्या डोळ्यांसमोर.

## खडकाळ झाडावर

खडकाळ झाडावर एक मैना,
खडकाळ रस्त्यावर एक स्टीमरोलर,
भगभगीत दुपार अंगावर घेत
ब्रॉंझचा पुतळा.

एक उमदा घोडा पोलादी बांधणीचा
विस्तीर्ण माळावर धावत असतो
खोडा घातलेला.

# वाद्यवृंद

एक वाद्यवादक
जखम होऊन खाली पडतो;
ठेंगू व लठ्ठ सुरकुतलेले चेहरे
शोक करतात.
एक झिंगलेला वाद्यवादक
दैवाच्या फटकाऱ्यासारखं तुसडं वाजवतो;
एक भटकणारा वाद्यवादक
स्वरांनी कुरवाळतो...
शेपटी नसलेलं एक माकड
वाकुल्या दाखवतं,
मेंदूच्या पिंजऱ्यांत
उड्या मारतं,
मुसमुसतं, किंचाळतं, बीभत्स हसतं,
सुन्न पडून राहतं.

# योगभ्रष्ट

उद्‌ध्वस्त मनःस्थितींत गावीं परतलों.
कशांतच मन लागत नाही.
अंतरांत सगळा वणवा पेटलेला.
अंतर्बाह्य उन्हाळा.
छातीच्या मध्यांतून अंगभर ज्वाळा.
बाहेर राक्षसाचा डोळा.
सूर्य दिवस चरचरा कापीत जातो.
सारा अवकाश रक्ताने भळभळतो.
गळा दाबलेलीं फुलें निर्जीवपणे गळून पडतात.
ओसाड रस्त्यांवरील दिवे मान लटकावून अगतिकतेने
प्रकाशूं लागतात.
मी
स्वप्नांच्या बंद दालनांत
स्वतःस कोंडून भिरभिरत राहतों.

रोज मी भोसकला जातों
आणि मेलेलें रक्त सर्वत्र पसरतें.
अंधार पसरला आहे सगळीकडे:
हाडाहाडांमध्ये,
डोळ्यांच्या खाचांमध्ये.
शब्द घसरून पडताहेत
आणि त्यांचा ध्वनी नष्ट झालेला.
अंधार, ओलसर शेवाळलेला अंधार,
मी माझें अस्तित्व चाचपतों.
मी थुंकून पाहतों.

मी नखांनी चेहरा ओरबाडून पाहतों.
उत्तप्त, शब्दातीत अवस्था.
कविता फुटूं शकत नाहीत. चित्रेंही.
लोखंडी तारा वाकवून पिळवटलेल्या आकृतीच शक्य.
काळोख. चक्रें. आवर्तनें. गरगर गरगरणें.

बसलों आहें. संध्याकाळ होत आहे.
कलतीं सौम्य किरणें. निरभ्र आकाश.
दूर झाडांची रांग. साकळून आलेलें मुकेपण.
असेंच बसून राहायचें अनंतकाळ.
सारेंच अर्थशून्य. निरर्थक. निरर्थक.
ही निरर्थकता घालवावी म्हणून कोठे जावें, बाहेर हिंडून यावें...
कोठे जावें ? कोठे हिंडून यावें ?
तेथेहि पाठलाग करीत येणारी ही निरर्थकता.
सकाळ. दुपार. संध्याकाळ. रात्र. सकाळ. दुपार...
घरीं. घराबाहेर.
सर्वत्र. सर्वकाळ.
सुनसान रात्र. काळोख. रातकिड्यांची किरकिर.
खिडक्यांची उघडझाप. घोंघावणारा वारा.
समग्र अस्तित्वाची आर्त हाक.

समोर एखादी वेश्या नाचत असावी
आणि आपण टाळ्या वाजवीत बसून राहावें.
झंझावातांत गदगदा हलणाऱ्या झाडाप्रमाणे
कामवासनेने दुबळा देह.

आज. काळाच्या संदर्भात 'आज'ला कांही महत्त्व...कोण जाणे!
लवकर उठलों. शुचिर्भूत झालों.
महाकालीच्या दर्शनास. यात्रा आहे. परवा पौर्णिमा.
चांदा हें शहर अमुकसाठी प्रसिद्ध असून तमुकसाठी
अप्रसिद्ध असलें तरी येथे दर चैत्र पौर्णिमेला महाकालीची
मोठी यात्रा भरते.
गर्दी. आत गेलों.
डोळे भरून पाहिलें. खिळून राहिलों.
एका सर्वस्पर्शी हाताचा स्पर्श सर्वांगभर झाला.
चलो. घंटी वाजविली. मागे वळून पाहिलें.
दोन डोळे प्राणावर रोखलेले.
येतांना रस्त्यांत मुलांजवळून कमळाचीं फुलें विकत घेतलीं :
कांही उन्हाने सुकलेलीं, इतर सुकूं घातलेलीं, सारींच्या सारीं
घेतलीं. *याद आती रही / दिल दुखाती रही.*

पांढऱ्यापिवळ्या फुलांचें एक झाड,
जाड बुंध्यांतून वर पसरलेला विस्तार. विशाल वृक्ष.
फांद्याफांद्या बहरलेल्या.
निळसर अंधार चहूंकडून साकळतांना
हिंस्रमधुर गंध नाकपुड्या भरून थेट काळजांत भिनत.
संधिप्रकाशांत सेक्सचें जिवंत प्रतीक.
हिंस्र गंधाने थरारून जातात नग्न रस्ते.

रानोमाळ भटकून गोठ्याकडे परतणारीं जनावरें.
हाडें बाहेर निघालेलीं. कंटाळवाण्या रांगेंत.
निरर्थक. धूळच धूळ.
ओसाड ओसाड संध्याकाळ.

वैराण फणफणलेलें शरीर.
रोगट पिवळा प्रकाश. दुखरे डोळे.
सरकणाऱ्या पाली. अक्षरांची गिचमीड.
मानव हा एक पशू आहे.
*मॅन ईज अ डोमेस्टिक ॲनिमल.*
घर आणि समाज करून राहणारा पशू.
शरीर हेंच सत्य. शरीराच्या सर्व प्रेरणा पवित्र.
काही धूर्त लोकांनी मन आणि आत्मा यांची निर्मिति
करून संपूर्ण मानवजातीला दुःखांत लोटलें.
शरीराला अन्न पाहिजे.
शरीराला दुसरें शरीर पाहिजे.
धर्म, नीति, राष्ट्र, संस्कृति, विश्वसंघटना, कीर्ति, संपत्ति
ह्या सर्व मूर्खपणाच्या गोष्टी आहेत.

भीषण संगीत
नाडीमधून वाहणाऱ्या रक्तांत घुसळतांना,
अजस्र व्हायोलिनचे तीक्ष्ण स्वर
छातीच्या सांगाड्यामधून गरगरत जातांना
माझा स्वर मरणातीत उंचावत जात.
मी थकतों. मी शक्तिहीन होतों. सबंध शरीर
रखरखतें वाळवंट. अनवाणी पावलांचे स्वर.
घाटरोडवरच्या खोलींत, खोली सोडतांना उधळलेलें कुंकू.
उरांत वणवा वणवा. जळत्या आठवणी. असह्य आहे.

असह्य आहे बसून राहणें. चला यात्रेंत.

कडक ऊन. दुपार बारा.

चपला काढून ठेवल्या. खाली जळती माती. वर तळपता सूर्य.
अपार भीड. चैत्र पौर्णिमा. नांदेडचे भक्त. तिथून ते
येतात. लोटांगण घालीत. मातेचें दर्शन.
*मज विश्वाची भोवळ येते*
*ये, सावर मज माते*
खाली जळती माती. वर तळपता सूर्य.
भक्तिधुंद स्त्रिया. जळत्या मातीवर साष्टांग.
पोतराजा. केस सोडलेले. अनवाणी.
वाद्य वाजतें आहे. ते नाचताहेत. अंगावर साठांचे फटकारे.
बहरलें *गा*. बहरलें *गा*.
पाय रक्ताळले. पाय रक्ताळले.
देवळाच्या आवारांतले दगडी खांबांवरचे टेंभे धडाक्याने
जळताहेत. वाद्य वाजतें आहे. केस मोकळे सोडलेले
पोतराजा अनवाणी नाचताहेत. साठांचे फटकारे मारून
घेताहेत. टेंभे धडाक्याने जळताहेत.

उरांत वणवा वणवा.
डोळ्यांत दाटलेलें पाणी.
माऽऽऽ!
कोटि सूर्यांची कांति.
मी. ज्वाळा. ज्वाळा. देदीप्यमान.

एक गाढव.
पुढचा एक पाय वाढलेला. त्यामुळे लंगडेपण.
कोणत्याच उपयोगाचें नाही. म्हणून मोकाट सोडून दिलें.
करुण ओरडत फिरत राहतें. दिवसरात्र.

साऱ्यांचें दुःख ओढून घेणें.
आपल्या काळजांतल्या दुःखांत मिसळून टाकणें.
कागदावर ओरखडणें.

सूर्य. डोळे. रक्तवाहिन्या. गुंतवळ.
चेतना गळूं लागलेली. रक्तवाहिन्या फुटल्या.
मज्जेतील सूर्याची उष्णता आणि प्रकाश मंद.
बधिरता. विलक्षण बधिरता.
अवजड विश्वाखाली चेंगरलें शरीर.
हें सर्व सोडून निघून जावें.
हें सर्व सोडून निघून जावें.

..."नंतर त्यांनी त्याच्या अंगावर जांभळें वस्त्र चढविलें,
काट्यांचा मुकुट गुंफून त्याला घातला; आणि ते
मुजरा करून त्याला म्हणूं लागले,
'हे यहुद्यांच्या राजा, तुझा जयजयकार असो';
त्यांनी त्याच्या मस्तकावर वेताने मारिलें; ते
त्याजवर थुंकले आणि गुडघे टेकून त्यांनी त्याला
नमन केलें."

वंचना. निराशा. वेदना. आकांत. खून. जाळपोळ.
कत्तल. वणवा. खून. आत्महत्या.
आत्महत्या.
आत्महत्या. आत्महत्या.
आत्महत्या. आत्महत्या. आत्महत्या.

तात्याजींचे डोळे.
चष्म्याची एक काच जाड. दुसरी निर्जीव. साधी.
जाड काचेंतून दिसणारा डोळा. मोठा. भयावह.

*आमि कि? आमि के? आमि केन? आमि केमन करें?*
*आमि कोथाय?*

मी युद्धाच्या देवतेचा पुत्र आहें.
माझा जन्म दिग्विजयासाठीच झाला आहे.
जयसर्वत्रअयशस्वीश्रीज्ञानेश्वरमाउलीअसमर्थ.

पडूं दे रे बॉंब
आम्हांवर
हे दयाघना
पडूं दे रे बॉंब
आम्हांवर
दयाघना, हे दयाघना, दयाघना रेऽऽ!
मी म्हणतों, रामरामरामराम सहस्र वेळां
आणि थुंकतों माझ्या शरीरावर सहस्र वेळां.

दुपार. जहरी. सळसळत्या कांतिमान सर्पासारखी.
रात्र. स्वप्न.
स्वतःच्या शरीराला धुळींत पाडून लाथा. बुक्या.
तुडव तुडव तुडवलें.
धडपडून उठलों. तळ्याकडे. बेभान गावें :
*आभाळांत चंद्र कसा*
*छान छान खुले*

एक प्रेत सडलेलें
तळ्यामध्ये डुले
अहा...

ख्रिस्त. ज्ञानदेव. बुद्ध. पैगंबर. चक्रधर.
हूण. तैमूर. चेंगीझखान. आइकमन.

लिहावें लिहावें,
लिहितां मरावें
हेंचि दान देगा देवा
सारा जन्म व्यर्थ जावा.
माझ्या जखमा ठणकत आहेत.
त्या चाटण्यासाठी एखादें कुत्रें तरी येऊं दे रे देवा.
दुबळा. भेकड. पराभूत. विकृत. निराश. उदास. एकाकी.
इत्यादि इत्यादि वगैरे वगैरे.

अंधार. आई. दिवलाण. इवलीशी ज्योति.
जाळीं. वार्धक्याचीं. काळज्यांचीं.
ज्या ओटीने तुझा भार वाहिला व जीं स्तनें तूं चोखिलीं तीं धन्य.

सूर्यावर काजळी.

तुझ्या अजस्र पावलाखाली
मला अगदी दडपून टाक;
नष्ट करून टाक मला
अगदी नष्ट.
माझे आवाज,

माझ्या ईर्षा.

एक चित्र काढलें
काळ्या आणि लाल रंगांत. कवीचें.
ओठ फुटलेले. छाती उसवलेली. रक्त बाहेर ओघळतेंय.
डोळ्यांत आग. मस्तकांत गरगरणारें चक्र.
लाल. सूर्य फाटून गेल्याप्रमाणे कविता.
आत्म्याच्या प्रदीर्घ आजारानंतर
मी ओकत सुटतों.
निरर्थक आणि बंदिस्त अंधारलेलें आंधळें जीवन झुगारून देतां यावें
आणि माझ्या मेंदूवर उमटलेली शापवाणी गळून पडावी.

रस्ता. झपाटलेलें वातावरण.
एक वेडी नाचते आहे. रेडिओंतील गाण्याच्या तालावर.
कंबर लचकवीत. डोळे मुरडीत.
आणि बसून असतों एखाद्या हॉटेलमध्ये. एकटाच. सिगरेट ओढीत.
खोल काळजांत डोळे रुतवून. हाडांमध्ये जळत असलेली आग.
इथून दुसरीकडे. दुसऱ्या हॉटेलमध्ये. तिसऱ्या. ओसाड ओसाड
रस्त्यांवर. सारी रात्र अशी खाऊन टाकायची. दि नाइटईटर्स.
दूर शहराचा मुलायम आवाज. दिव्यांची रांग. अजस्र प्रकाशस्वर.
अंतराळांत मधुर झंकार मधुर.
किती व्यक्तिमत्त्वें किती फेर धरून.
पुन्हा एक चहा. सिगरेट. हाडांत जळणाऱ्या आगीशी संगम,
उपनदी.
क्षयी चंद्र. लांबच लांब पसरलेला रस्ता. काळ्या फांदीवरून
सरपटत एक सर्प. पाखरांचा चीत्कार. फडफड.

ओरबाडून काढावा चेहरा नखांनी.
व्यर्थ आहेत व्यर्थ आहेत.
माणसाला मारावयाचे/मरावयाचे किती विविध प्रकार.
आमचे येथे सर्व प्रकारचा माल ऑर्डरप्रमाणे तयार करून मिळेल!
विजेची खुर्ची. गिलोटीन. उकळतें तेल. डोळे काढणें. हत्तीच्या पायदळीं.
युद्धांत तर घाऊक प्रमाणावर मरतां येतें.
शिवाय पाण्यांत उडी टाकणें. जाळून घेणें. विष. झोपेच्या गोळ्या.
अपघात. भूकंप. भुकेने व्याकुळ होऊन मरणें.
*सदा लागती गा वेध*
*येथें मृत्यूचे मृत्यूचे*
*आणि जीवाला लागतें*
*वेड एक विझायाचें*
आत्महत्या करून मरून गेलेल्या कवीची कविता.
त्याने काय घेतलें होतें कोण जाणे!
मृत्यूचे वेध.

मृत्यूचे वेध.

दूरवरून
कुणा देवालयामधून
स्वरवलयें...
आणि तो आपल्या पावलांखाली कृमिकीटक दुखावले जाऊं नयेत
म्हणून कारुण्यांत पावलें लपवून जीवातळीं जीव आंथरीत जातो
अतिशय हळुवार भ्रमर जसा कमलदलावर आणि खुपेल म्हणून
डोळे रोखून पाहत नाही पाहतो तेव्हा अमृताचा वर्षाव आणि शब्द
लागेल म्हणून मौन बोलतो तेव्हा अमृताचे कल्लोळ.

क्रौर्य. रक्ताचे पाट. मुंडक्यांचे मीनार.

महात्मा की हुकूमशहा ?
महात्मा की हुकूमशहा ?

अहा. *नई नवेली दुलहन जैसी रात*
*तारोंकी बरसात*.
गात राहावें. गात राहावें.
रात्र पाहत राहावें.
पहाट. पहाट. पहाट.
एके दिवशीं पहाटेस :
दाराची कडी वाजली. आजकाल झोप नसतेच. *सदा लागती गा वेध*
*दाराच्या कडीचे*. निघालेच. शर्ट. टोपी. काठी. अंधार. चाचपडत,
धडपडत निघाले. विचारावें : कुठे जाता तात्याजी ?
मोह आवरला. मागे मागे. पाय पिसाहून हलके.
दिसत नाही. दिसत नाही. ठेचा लागताहेत.
गल्ली ओलांडली. पडत होते. काळजांत तुटलें.
पुढे व्हावें. परतण्यास सांगावें. थांब.
प्राथमिक शाळेचें प्रांगण. झोपलेलीं कुत्रीं. अंधार.
अंधारांत निघालेला माणूस. अंधार डोळ्यांत घेऊन निघालेला माणूस.
अंधारांत जाण्यासाठी निघालेला माणूस.
कुत्र्यांवर पाय. झोपलेलीं कुत्रीं खवळून भुंकूं लागलीं.
हातांतील काठी त्वेषाने अंधारावर फिरविली.
मी उभा चिरलों.

गुलाब. गुलाब. गुलाब.
जखम. जखम. जखम.

मस्त कल्पना.
आता हें वस्त्र गळून पडायचें.
आता हा हात. आता हा पाय.
एक एक पेशी नष्ट व्हायची.
कावळा जसा लहानशा चोचीनें जखमी जनावरास लुचतो,
लहानसा मांसाचा तुकडा तोडून तोडून काढतो.
असें संपायचें. खूप कल्पना.
आता असें कर.
तूं मला जंगलांत ने.
कुऱ्हाडीनें माझे तुकडेतुकडे करून टाक.
अगदी बारीक तुकडे
नि दशदिशांत उधळून टाक.

हें सर्व सोडून निघून जावें.
हें सर्व सोडून निघून जावें.

लालजर्द गुलाब.
रक्ताच्या नद्या.
कामदेवता.
पीन स्तन. पुष्ट नितंब.
आनितंब रुळणारा केशकलाप.
नितंब. नितंब. नितंब.
योनीला म्हणे कमलफुलाचा गंध !

रस्ता. संध्याकाळ. कातरवेळ. शून्य.
धूळ बसलेली. पावलें उमटलेलीं.
अंधार साकळूं लागलेला.

रस्ता गातोय.
खिन्न. उदास.
रस्ता. चांदण्याची नक्षी.
एकटा.
अंतःकरण फोडून येणारी कविता.

तेजोमय.
तेजोमय.
तेजोमय.
मी.
तेजोमय.
नश्वरतेचें स्वरवलय.
स्वरवलय. स्वरवलय. स्वरवलयें.
शुद्ध झालें पाहिजे. निष्कलंक झालें पाहिजे.
पंच महानद्यांत स्नान. जाळून घेतलें पाहिजे.
करवतीं घालून घेतलें पाहिजे.
इंद्रियांचे दीन. इंद्रियांचे दीन. इंद्रियांचे दीन.
शापभ्रष्ट देवदूत.
*देव भक्तासी करूं नेदी संसार*
*अंगीं वारावार करुनी ठेवी.*
नशा. मस्त नशा.
दुःखाचा. प्रेमाचा.
*तुझीं स्वप्नें फुलांचीं असोत*
*हे सुकुमारी, तुझीं स्वप्नें फुलांचीं असोत.*

बुद्धम् सरणम् गच्छामि.
सरणम् गच्छामि.

सरणम्. सरण.

सूर्य.
महासूर्य.
महासूर्यांत मी.
किरणाकिरणांत मी.
रंग मी. गंध मी.
माझ्या आत्म्याचीं किरणें
तिच्या आत्म्यांत.
घाट रोडवरली खोली.
रोज प्रेतें. प्रेतें.
भगवान हतबुद्ध.
खोली सोडतांना कवितेच्या वहींत पालीचीं अंडीं.
रात्रीं स्वप्नांत खूप पाली.
एक तर साली सारखा पाठलागच करीत होती.
घाबरणें. घाबरणें. घाबरणें.
पीरिअड ऑफ इन्सिक्युरिटी.
निराश्रित. नाक कापलेले. कान कापलेले.
हिंदु. मुसलमान. कापाकापी.
एक बॉंब टाकून द्यावा.

जवळ येऊं शकत नाही.
दूर जाऊं शकत नाही.
समांतर रेषा.

मी.
शापभ्रष्ट देवदूत.

मानव आहे ना, म्हणून मानवाचीं इंद्रियें.
मानवाचे विषय. मानवाच्या वासना.
कांहीही भोगतां येत नाही.

भर उन्हांत. रात्रींबेरात्रीं. ह्या देवळांत. त्या देवळांत.
देवळें. देवळें. देवळें. वैताग. वणवा.
पण जिवाला लागलेला वणवा विझला नाही.
विझणें शक्य नाही.
तर देवा, जळून जाऊं दे रे.
स्वतःच्या शरीराला तापवणें.
आत्म्याला तापवणें.
उपास.
उपास.
उपास.

स्वप्नें.
तिचीं कोमल बोटें. माझीं बोटें. गुंफलेलीं.

यातना. यातना. यातना.
तात्याजींनी म्हणे तळ्यांत उडी टाकली होती.
गळाने ओढून काढलें. ओले घरीं आले.
आपणही बुडावें. एखाद्या पोरीच्या उरांत.
कमल. उषा.
अहो, मला बुडवा हो.
कोवळ्या पानांच्या झाडाला वणवा.
तो मोजीत राहिला
हातांत गळून पडलेलीं पानें.

फडफडत खिडकींतून आंत आलेलें पिंपळपान अजून जपलें आहे.
*नीज, नीज माझ्या बाळा*
*आकु करतो रे गाई*
*काउ करतो रे गाई.*
डोळे उघडले. मिटले. उघडले. तर सकाळ.
झोपच नाही झाली.

पाय थकले.
संगीतलहरींवर पहुडावें.

मी.
पावणेसहा फूट.
एकशेदहा पौंड.
अठ्ठावीस इंच.

*पग घुंगरू बांध मीरा नाची रे.*
*पग घुंगरू बांध मीरा नाची रे.*

खूप झोपलों. खूप झोपलों.
नि खूप उदास झालों. हूं हूं चें गीत.
अंतःकरण रिकामें रिकामें.
*बैसून कुठेंतरि कांटेरी झुडुपांत*
*तव हूं-हूं-हूं-चें होतें गीत वहात !*
*येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा*
*जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.*

एकांक.

म्हणजे काय तर एकट्याने गुडघ्यांत तोंड खुपसून रडणें.
तो म्हणे कवितासंग्रह. त्याची म्हणे अर्पणपत्रिका.
एखाद्या माणसाच्या छातींत जखम झालेली असावी,
त्या दुःखांतून सारख्या वेदनेच्या कळा निघाव्यात,
त्या दुःखाच्या व्यथेच्या गुंगींत डोळे मिटावे,
स्वप्नें पडावीं, कण्हावें, मध्येच सुस्कारेउसासे
दबलेल्या ओठांतून बाहेर पडावे, जें व्यक्तच करतां
येत नाहीं असें दुःख एखाद्या शब्दांतून साकार होऊं पाहावें,
तशा ह्या कविता :
स्वप्नांतलें कण्हणें. मरणाच्या सावलींत वेदनेच्या गुंगींत
भरकटलेलें मन. आभासमय नंदनवन
मर्त्य जीवांना सादर समर्पित.
जय भोलेशंकर !

आज पुन्हा सूर्य फुलासारखा कोमल वाटतो.

उन्हाचा नशा.
चहाचा नशा.
चारमिनारचा नशा.
बस्स
तापलेल्या लाल सळ्या घ्याव्या
नि दोन्ही डोळ्यांत खुपसाव्या.

तिरमिरत. तिरमिरत.
भिरकटत. भिरकटत.

अरे ए भुंकणाऱ्या कुत्र्या,
खा माझीं हाडें.
मांस नाही
रक्त नाही
हाडेंच फोडून खा.
परमेश्वराची भूक लागली पाहिजे.

षंढ.
नपुंसक.
गांडू.
हिजडा.

रस्त्याच्या कडेला
मरतात साली.
लिहून टाकायचें.
जाळून टाकायचें.
उत्तुंग मनोरे.
कोसळलेलें आयुष्य.
खाओ. पिओ. मजा करो.
क्या खाओ ?
क्या पिओ ?
क्या मजा करो ?
कित्येकजण म्हणे सर्पांचा लाग पाहण्यासाठीच रानोमाळ
भटकतात, घरादाराचें रान करतात.
घाट रोडवरची खोली.
चिमण्यांचे लाग.
पालींचे लाग.

मुलामुलींचे लाग.

कोणीच मागे राहिलें नाही. दिवा लावायसाठीही.
आपल्या रक्तांतून नवें घर निर्माण करायचें. जन्मभर
खस्ता खायच्या. दुःख सोसायचें.
सुख कधी लाभलें नाही. डोळ्यांचें पाणी खळलें नाही.
आता म्हातारपणींही उन्हाळाच उन्हाळा.
क्लेश. क्लेश. क्लेश.
ज्या ओटीने तुझा भार वाहिला व जीं स्तनें
तूं चोखिलीं तीं धन्य!!
सब साला बेकार है!
कपाळ.
डोळा. नाक. डोळा.
ओठ.
*किती घासुनी नाक तुझें तें*
*झिजून गेलें पहा च्यूतिया*
*कितिदा साल्या केस वळवितो*
*छान छान तू अहा मर्कटा!*

आपल्या हातांत विस्तव घेऊन काळीज जाळण्याचा कार्यक्रम.

छातींतून घोडे भरधाव बाहेर पडताहेत.

नगर झोपलेलें आहे
रात्रींच्या खांद्यावर मान टाकून.

शाई ?
खुपस पेन दंडांत.

माणसाला किती किती लागत असतें.
खोली. जेवण. टॉवेल. अंडरपँट. बनियन. कपडे. अंथरुण.
अंथरुणावर बाई. रांड. वेश्या. नाच. हमाल. तमाशा. नाटक.
स्नो. पावडर. लिमलेट. लिलीचीं फुलें. हृदय. वेदना. टायर.
ब्लेड. मोटार. ॲक्सिडेंट. विमान. गांजा. अफू. भांग. कंगवा.
दारू. दारें. खिडक्या. शेंगा. तेल. साबण. बाथरूम. जन्म. मरण.
काकोडकरची कादंबरी. लग्न. मंडप. महापुरुष. ठेकेदार. मुंडावळ्या.
बँड. स्टँड. लोकल. बस. म्युनिसिपालिटी. डी० एस० पी०. कुत्रीं.
थडगीं. मासिकें. टाइप. फाउंड्री. संततिनियमनाचीं साधनें.
कॉटेब.

हे ओसाड दुपारच्या सूर्यदेवा
या माझ्या हाडांच्या सांगाड्यामधील ओसाड ओसाड सूर्यदेवा.

सत्य मी. सत्य मी. सत्य मी.
माझ्या मुखांतून सत्यच बोलतें आहे.

नंतर अकरा वाजले.
नंतर बारा वाजले.
नंतर एक वाजला.
नंतर दोन वाजले.
नंतर बारापर्यंतचे सर्व आकडे वाजले.
नंतर एक वाजला.
नंतर . . .

नंतर त्यांनी भाल्यांस मुंडकीं टोचून
नगरभर तीं मिरविलीं.

शांतपणे त्याने आपल्या तोंडास काळें फासलें.
हातांस. पायांस. सबंध देहास.
आणि नंगाच तो दाराशीं उभें असलेल्या गाढवावर
गाढवाच्या गांडीकडे तोंड करून बसला.
शांतपणे त्याची ती धिंड नगरांतील प्रशांत आणि प्रशस्त
मार्गावरून मोठ्या डौलांत निघाली.
मोठमोठ्या श्रेष्ठींच्या भवनांच्या सज्ज्यांत शांतपणे गर्दी करून
असलेल्या सटवायांनी त्याजवर पुष्पांचा वर्षाव केला.
अमंगल आरत्या ओवाळल्या.
महायात्रा.
महान शांतता.
दुतर्फा अलोट शांत गर्दी.
त्या शांत गर्दीतून नगराच्या महाद्वारांतून
तो महापुरुष
हलके हलके निघून गेला.

भजन.
*काळ्यावरतीं जरा पांढरें*
*या पाप्याच्या हातुन व्हावें...*
*या पाप्याच्या हातुन व्हावें...*

कुत्रीं भुंकत असतात. तो किंचाळतो. दोन्ही हात छातीवर
दाबून धरतो. डोळे गच्च मिटून घेतो. अंधाऱ्या गल्लींतून
तिरमिरत तिरमिरत भिरकटत भिरकटत रस्त्यावर येतो.

थांबतो. हात खालीं सोडून देतो. संवेदनाहीन. चेतनाहीन.
मनांत भुंकणें. किंचाळणें.
शेपूट हालवीत लाडें लाडें एक कुत्रें त्याच्याजवळ येतें.
त्याच्या भोवती भोवती करतें. हळूच त्याच्या पावलांना जिभेचा स्पर्श करतें.
तो एकदम डोळे उघडतो.
कुत्र्याच्या गळ्याभोवती हात घालून हमसून हमसून रडूं लागतो.

उन्हाचा नशा.
चहाचा नशा.
भुकेचा नशा.
शेंगदाण्याचा नशा.
गुळाचा नशा.
दोन्ही मुठी भरभरून ही तापलेली माती डोक्यावर उधळावी.
सूर्य जळताहे.
रस्ता जळताहे.
झाडें जळताहेत.
पक्षी जळताहेत.
आईसफ्रूट जळताहेत.
*जलनेवालोंसे दूर.*
*दुनियावालोंसे दूर.*

पाण्यांत सांडलेलें आकाश.
सांडपाण्यांतलें आकाश.

झिमझिम.
मरणपाकळ्यांचा वर्षाव तिच्या सुमनकोमल देहावर.

मरणसूर्यांच्या कोवळ्या किरणांचा तिच्या पावलांना स्पर्श हळुवार.
चोवीस पाकळ्यांचें सुमन नश्वराच्या माथ्यावर.
मी वेचतों धुळींत माझीं सांडलेलीं फुलें.

या शरीराचा मला कंटाळा आला आहे.
या शरीराचा मला कंटाळा आला आहे.

तंबाखू. सिगरेट. भांग. गांजा.
शरीराला तापवणें. शरीराला तापवणें.
मस्ती पाहिजे. नशा धुंद.

फुलें वर्षताहेत वाटेवर
आणि आपण चालतों आहों. आपण चालतों आहों.
संगीताच्या झूल्यावर आपग झुलतों आहों. आपण झुलतों आहों.
कमळें. कमळें. लाखों कमळें.
पाहत बसावें. पाहत बसावें.
वाऱ्याच्या झुळुकेने कमळांसवें आपणही आंदोळावें.
डोळे मिटावे असे सूर्यासमोर आणि डोळ्यांच्या आंतल्या
तेजोमय निळ्या रंगांत सारें कांही विसरून जावें.
तन्मय होऊन जावें.
हें मृत्तिकेचें शरीर
एकदम प्रकाशमय व्हावें.
*तारा जीवननो शुभ्र प्रकाश धरापर पाथरजो.*

हाडें. हाडें. हाडें.
या हाडांना सुंदर वस्त्रांत गुंडाळायचें.
एकदम अश्लील.

नग्न फिरावें.
अगदी नग्न फिरावें.
मरावें आणि सगळ्या यातनांतून सुटावें.
मरावें आणि सगळ्या यातनांतून सुटावें.

डोळ्यांच्या डोहांत.
डोळे.
सर्पांच्या जिभा लवलवतात.

द वर्ल्ड ऑफ् अवलियाज्.
पागलों का जगत.
फूल्स पॅरडाइज.
मी आहें एक मोठा विदूषक.
लांब आहे माझें नाक.
माझीं स्वप्नें जळून खाक.
ओ...हो...हो...ल...ला...ला...

रस्त्याच्या कडेला मरून पडलेली भिकारीण.
हाडें हाडें नुसतीं हाडें.
वाळून गेलेलें आहे तिच्या योनीचें कातडें.
कदाचित् जिवंत क्षणभर माझ्या डोळ्यांतील वासनेने
रक्ताच्या ओहोळांत लडबडलेले तिचे स्तन
फाटलेले ओठ.

हें सर्व सोडून निघून जावें.
हें सर्व सोडून निघून जावें.

ज्याच्याशी स्मृति निगडित त्या प्रत्येक वस्तूचा नाश.
तुझ्यासाठी संन्यास.
भोग आहेत. भोगले पाहिजेत.
*निसदिन बरसत नैन हमारे.*
*निसदिन बरसत नैन हमारे.*
परमेश्वरासाठी जीव आसावला पाहिजे.
रात्रंदिवस जीवाला चैन नाही.
डोळ्यांतून अविरत अश्रुधारा.

मी हलकट आहें. नीच आहें. पापी आहें. दुराचारी आहें.
नरकवास भोगला पाहिजे. मृत्युलोकांत नरकवास.
नरकाचे विविध प्रकार.
पंकप्रभा.
तमःप्रभा.
उग्रःप्रभा.
या हाडांना जाळायचें.
अरे अथवा अहो हे लोकांनो
मला प्रथम मारा
हालहाल करून मारा रे बाप हो
आणि नंतर
रस्त्याने फरफटत स्मशानाकडे न्या.

आणि मीं माझ्या हाताने बहरलेल्या झाडाचें फूल तोडलें.
आणि झाडावरचीं सारीं फुलें कोमेजलीं. आणि झाड वाळून गेलें.
आणि मीं झुळझुळत्या नदीमधून ओंजळभर पाणी घेतलें
आणि सारें पाणी रक्त झालें.
आज सूर्य काळाभोर

आणि डहाळीवरचीं फुलें मेलेलीं.

मादक सौंदर्य.
नितंब.
न्हायलेले केस.
नो अटॅचमेंट !
सर्वांपासून दूर. अलग.
भयंकर एकटेपणा. जीवाला जाळणारा.

पूर्ण उमललेलें फूल.
इतका जिव्हाळा कां वाटतो त्याजविषयी ?
हे स्वर कोणत्यातरी अनामिक पक्ष्याचे
किती जवळून काळजांतून येताहेत असें वाटतें.
अरे !
तरी माझी स्मृति नष्ट होत नाही.

यथेच्छ आंघोळ झाली. फार बरें वाटतें.
उदबत्तीचा दरवळ. फुलांचा गंध. चंदन. देव्हाऱ्यांतील देव.
गंध. फुलें. नीरांजन. तमसो मा ज्योतिर्गमय.
एहेऽहे
कानांना देव ऐकूं यावा.
डोळ्यांना देवाचें दर्शन.
मनाला देवाचीं स्वप्नें.
या हातांनी देवाची पालखी खांद्यावर न्यावी.
देहधारी मानवाला मोठ्या कष्टानें देवाची प्राप्ति होत असते.

सूर्याला नशा. वारा वाजतांच्या उन्हाचा.

गिरमिटासारखें ऊन डोळ्यांत घुसतें.

कपाळभर कुंकू.

दुःखाचे दिवस गेले
सुखाचे दिवस आले.
दुःखाचे दिवस गेले
सुखाचे दिवस आले!

लाल फुलें.
त्रिवेदीचा नशा.

महाकाली.
जळते डोळे.
जळतें हास्य.
जळतें, उघडेंनागडें नृत्य.
विशाल मस्तक
त्यावर झिळमिळणारीं पिंपळपानें.
जळता कोकिळाचा स्वर.
या सर्वांना उराशी धरावें.
छाती जळून जावी.
हें सर्व.
हें मेलेलें जनावर.
ह्या घोंगावणाऱ्या माशा.
हे उघडे अचेतन डोळे :
जन्मभर लपवलेलें दुःख मेल्यावर उघडें झालें.
डोळे. दिवस. डोळे. रात्र. डोळे. स्वप्न.

दुःखाचा क्रूस. दुःखाचे खिळे. दुःखाचा पुत्र.
दुःखाच्या चरणांवर छातीभर दुःख.

तुझ्या कपाळावर कुंकवाचें बोट.
हे *सुकुमारी,*
*तुझीं स्वप्नें माझीं असोत.*
हळदीची चंद्रकोर
त्यावर कुंकवाचा सूर्य.
लालजर्द गुलाब.
अंगभर गुलाबाच्या कळा.
शय्या.
चिंचेचें एक पान.
ये सुकुमारी,
ह्या लालजर्द फुलांमधून
तूं ये.
ये सुकुमारी,
ह्या दुपारच्या कंठांतून उमलणाऱ्या आर्त लकेरींतून
तूं ये.
ये सुकुमारी,
ह्या शरीरांतून
तूं ये.

संहारकाल.
ब्रह्मांड जळताहे.

तूं.
मागे मावळत्या वेळेचें क्षितिज.

महाकाय तूं.
माझ्या डोळ्यांचे परिघ
मर्यादित.
पांच फूट उंचीचें फूल.
मी नशेंत आहें!

दोन सूर्य
दोन डोळ्यांत.
तिसरा सूर्य
कपालमध्यांत.

सूर्याला नशा.
सूर्याचा नशा.
देहाला. अंतरात्म्याला.

ठेचाळतों. रक्ताळतों.

बैल उन्हाने वाळून गेले.
मरेस्तों ओझें ओढणें.
उन्हांत तापत राहणें.

जाळ.
तापलेलें डांबर.
रस्तेदुरुस्तीच्या कामावरचा मजूर.
काळें तापलेलें डांबर.
अंतर्बाह्य भडकलेली आग.
डांबराच्या डब्यांत उतरून स्नान केलें तरी आग शोंवणार नाही.

सबंध देहास काळें लागलें तरी तें कांहीच नव्हे !

दोन बहिणी.
संवाद.
घर. नवरा. पोरें.
कटकटी.
मल लग्न करायचें नाही. तुम्हीं शिकूं दिलें नाही. तुमचा संसार दरिद्री.
जबरदस्तीने लग्न लावलेंत तर संन्यास घेऊन निघून जाईन.
त्याचेंहि खरेंच. जुनाट वाड्यांतील जंतु. काळोख्या कोंदट
खोलीप्रमाणेच त्याचें आयुष्य.
भर उन्हांत बैल. पशूंना मन भावना संवेदना कांही आहे की
नाही ? आपण जनावरेंच आहों. आपणहि जन्मभर
उन्हांतच तापत राहतों.

परमहंस झालें पाहिजे.
परमहंस झालें पाहिजे.

राखेच्या रंगाचीं पाखरें. बहुधा राखेंतून जन्मलेलीं.
बहुधा राख होण्यासाठीच मरणार.
दोन राखेच्या रंगाचीं पाखरें.
बहुधा ती आणि मी.
कोणत्या विचित्र क्षणीं डोळ्यांमध्ये डोळे.
जळतीं उकळतीं स्वप्नें.
डोळ्यांतील सूर्यांना आयुष्याचें अर्घ्य.
*तूं काय करिसी माझिया संचिता*
ललाटरेखा.
असें होणें अगत्याचें आहे आणि तें झालें.

मी खंजीर.
डोळ्याचें पातें लवतें न लवतें.
हवेंत तळपून काळाच्या छातींत.

तिरडीवरील शव : मी.
वाहून नेणारे चौघे : मी ४.
मागे : मी.
अग्नि देणारा : मी.
तात्पर्य : याचेंच नांव मृत्युलोक!
कालवृक्षाची पानझड म्हणे!
अलंकारिक भाषेंत लिहितां येईल.
फुलें फुललीं आहेत. त्यांना मरणाच्या ओठांनी चुंबिलें आहे.
मरणाचे वृक्ष सळसळत आहेत.

हें दुःख.
हा अपमान.
ह्या यातना.
हें सर्व छातीशीं धरावें.

सळसळती वासना.
अफाट आयुष्य पेटून निघतें.
अंतरात्म्यांत वणवा वणवा.
यांतून निघालें पाहिजे. यांतून फार लवकर निघालें पाहिजे.
सोडलेल्या सांडाप्रमाणे मस्तींत झिंगावें.
शिंगाने माती उकरून आव्हानाची मस्त डरकाळी फोडावी.

दुःख. काम. अध्यात्म.

यातनात्रिवेणी.

महाकाली.
नशाधुंद.
मर्त्यांच्या रक्ताचा नशा.
हे डोळे. हें हास्य.
विषारी सर्पांचा संचार माझ्या देहांत.

किर्र रानजाळी.
स्मशान.
खंडारें.
वेदनेच्या मस्तींत.
काळेंभोर पाणी. चंद्रकोर.
काळ्याभोर झाडांच्या काळ्याभोर सावल्या.
वेदनेच्या मस्तींत.
माझें काळीज आणि माझा कंठ कापीत निघालेली तान.
विष चढलेली.
काळे पक्षी.
मनच्या आगीने कोळपून
काळे झालेले पक्षी.

हे इथेतिथे बसलेल्या काळ्या पक्ष्यांनो,
या रे माझ्या काळ्या पक्ष्यांनो,
माझ्या खांद्यावर बसा.
माझ्या डोक्यावर बसा रे राजे हो.
गा तुमचें जळून गेलेलें गाणें.
तुमच्या जळून गेलेल्या जीविताचें गाणें.

रक्तवाहिन्या आटताहेत, या उद्ध्वस्त दिवसाच्या
कोरड्याकरड्या सापळ्यांत मी बंदिस्त.
मुक्त मी नाहीं कधीच;
पाताळांत बांधलेला दगडाला
माझ्याच अज्ञात वासनांच्या.
युगयुग त्रस्त जीवाचें
अंधारून आलेंय आकाश.

तर देवा, उजळ रे तम हें.

जांभळे पक्षी असतील तुझ्या दारीं
नाचत नाच दिव्य अप्सरोगायनें
रोग येथे कुरतडताहेत इमारती,
रस्ते, बागबगीचे;
पंख तुटलेला एक गंधर्व
तुटलेल्या वाद्यावर मंजुगीतें...
नाही, नाही. आकांत त्रस्त आत्म्याचा.
रामरामराम मर कोरडाच
अतृप्त पिशाच्च हो.
सुटका नाही कोठेच.

नाही एक अक्षर जुळत सरळ.

23-- ना. क्र. 27597 काव्य
REFBK-0021591
REFBK-0021591



